# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २२/१२/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २२/१२/२००६ रोजी सभा सुचना क्र. २३ दि. १८/१२/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ९) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य१ |
| १०) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ११) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १२) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १४) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १५) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १६) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्या, सन्मा. सदस्य, मनपा अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग आजची ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडेल अशी आशा बाळगतो व सभेचे कामकाज चालविण्याकरिता मा. सचिव साहेब यांना मी पुढील आदेश देत आहे.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

सभापती साहेब, सभा सुरू होण्यापूर्वी आपल्या परवानगीने बोलू इच्छितो की, आपल्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त हे या मा. स्थायी समितीच्या सभेला उपस्थित राहणे गरजेचे आहे. असा अधिनियम १९७० नुसार मी बोलतो आहे. आज सन्मा. पानपट्टे हे आलेले आहेत ते मा. आयुक्त म्हणून आलेत की, मा. आयूक्तांनी त्यांची नियुक्ती केली व ते कोणत्या कलमा नुसार त्यांची नियुक्ती केली आहे याचा प्रशासनाने प्रथम याचा खुलासा करावा अन्यथा सचिव साहेबांनी त्याबद्दल त्यांना मार्गदर्शन करावे.

**ज्यूडी डिसोझा :-**

प्रशिक्षणामध्ये आपल्याला काय सांगितलेले आहे?

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, पाहिल्यांदा मी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा.

**ज्युडी डिसोझा :-**

मी देखिल तेच बोलत आहे.

(नगरसचिवांनी कलम ६९ मध्ये जी तरतुद आहे त्याचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

या तरतुदीला स्थायी समितीची पूर्व मंजूरी आहे का? ते बघा. कारण स्थायी समितीच्या पूर्व मंजूरी शिवाय करु शकत नाही आणि या स्थायी समितीत मा. आयुक्तांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये असे ही म्हटले आहे की, मा. आयुक्तांनी लेखी दिले पाहिजे. तर लेखी दिले आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

लेखी दिले नाही. तोंडी सुचना असतात व आयुक्त साहेबांचा प्रतिनिधी म्हणून मी हजर आहे.

**शशिकांत भोईर :-**

नियमाप्रमाणे काय आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, नियम असतात पण त्यांनी तोंडी सुचना दिलेल्या आहेत.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्हाला सुचना दिली हे आम्हाला कसे कळेल?

**जयंत पाटील :-**

तुम्हांला सुचना दिली की, नाही हे आम्हाला कसे कळणार?

**शशिकंात भोईर :-**

आणि तुम्हाला सुचना देतेवेळी त्यांनी स्थायी समितीची पूर्व मंजूरी घेतली होती का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

प्रत्येक वेळेला साहेब काही कारणास्तव...

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही खुलासा करावा. सचिव साहेब, आपण याच्याबद्दल खुलासा करावा.

**नगरसचिव :-**

माझ्याकडे असे लेखी काहीही आलेले नाही.

**शशिकांत भोईर :-**

खुलासा करा. नाहीतर , ही सभा तहकूब होईल.

**शशिकांत भोईर :-**

आयुक्त साहेब, येणारच नाही. आयुक्त साहेब कोणत्याही सभेला येणार नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

काही कामानिमित्त आयुक्त साहेब हजर राहू शकत नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

स्थायी समितीला आयुक्त साहेब, पाहिजे प्रत्येक वेळीच ते हजर राहू शकत नाही का?

**हंसुकूमार पांडे :-**

प्रत्येक वेळी.

**ध्रुवकिशोर पाटील :-,**

सन्मा. सभापती साहेब, आता उपायुक्त पानपट्टे साहेब हजर आहेत. मग ही सभा कायदेशीर होईल की बेकायदेशीर होईल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. आयुक्तांचा प्रतिनिधी म्हणून मी उपायुक्त आहे तर ही सभा कायदेशीरच होईल.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्तांनी तुम्हाला लेखी दिले आहे का?

**ग्रिटा फॅरो :-**

तुमच्याकडे लेखी दिले आहे का तर नाही? तुमच्याकडे लेखी पुरावाच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण खुलासा करु नका. सचिवांना खुलासा करायला द्या. सचिव साहेब, ही सभा कायदेशीर आहे का बेकायदेशीर आहे या बद्दल तुमच्याकडे लेखी सुचना नाही. उद्या जर समजा आम्ही एक कम्प्लेंट केली तुमच्याकडे तक्रार केली की, सदर सभेला मा. उपायुक्त पानपट्टे साहेब उपस्थित होते आणि आपणांस लेखी सुचना मिळाल्या नाहीत. तर ही सभा, सभेमध्ये जो निर्णय घेणार जो ठराव होईल त्याचे इम्प्लीमेन्टेशन करणार की नाही किंवा ते कायदेशीर आहे की, बेकायदेशीर आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

मा. आयुक्त साहेब, बोलतील की, मला काही माहिती नाही. मी त्यांना आदेश दिला नव्हता. त्याबद्दल काय पुरावा आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

सन्मा. सभापतींच्या परवानगीने मी बोलत आहे की, यापुढे ही आपल्या अशाच सभा मा. उपायुक्तांनी म्हणजेच त्याच्या हजेरीत आपण लावल्या होत्या. आणि ते चालवायचे आणि बाकीची जी आपण मंजूरी घ्यायचो. मग ते आणि नंतर मंजूरी साठी बोलायचे की, तुम्ही कमिशनरला भेटा म्हणजे कुठे काही इन्प्लीमेंट होतच नाही. मग, मा. उपआयुक्त इथे यायचे. मा. कमिशनर साहेबांनीच इथे येउन सभा चालवायची असे कायद्यानुसारच आहे.

**हंसूकूमार पांडे :-**

सचिव साहेब, यह एखादं बार हो जायेगा। तो बात अलग है पर हर टाईम मा. उपायुक्त आयेंगे। रूल्स मे क्या लिखा है मा. आयुक्त ही यहा पर बैठने चाहिए। तो हर टाईम पर डेप्युटी कमिश्नर बैठेगा। और वह भी रिटन मे होना चाहिए तो रिटन मे भी नही है।

**मा. सभापती :-**

ठराव करके उसका तरतुद है। ठराव करना चाहिए था।

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. कमिश्नर साहेब, जर कुठे कामानिमित्त बाहेर जात असतील तरी त्यांची आपल्या येथे एक नोट टेबलावर असली पाहिजे की, काही कामास्तव बाहेर गेलेले आहेत आणि तसे लेखी मा. उपआयुक्तांना दिले पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

या पुढे असे करण्यात येईल.

**जेन्वी अल्मेडा :-**

मग, आताची ही सभा आम्ही कशी मानायची कायदेशीर की बेकायदेशीर असे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यांनी मला असा निरोप दिला आहे की, त्या संदर्भात सदरची सभा........

**जेन्वी अल्मेडा :-**

ह्या पुढे ही आम्ही काही ठराव केलेले आहेत व ते आमच्या सभेपुढे मंजुर झालेले आहेत आणि नंतर मा. उपआयुक्त हात वरती करुन सांगतात की तुम्ही कमिश्नरला भेटा. मग, सभा चालवतात मा. उपआयुक्त तरी सुध्दा ते आम्हाला सांगतात की, तुम्ही मा. कमिश्नरला भेटा मग, मा. कमिश्नर साहेबांनीच इथे येउुन सभा चालवली तर बरे होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

काही - काही गोष्टी मध्ये ठोस निर्णय घ्यायचे असतात. त्यासाठी मा. आयुक्तांना प्रत्यक्ष भेटायला सांगितले आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, प्रत्येक वेळेला जर मा. आयुक्तांना सभेला येता येत नसेल तर त्यांनी मा. स्थायी समितीची लेखी परवानगी घ्या. मंजुरी घ्या. की मला वेळ देता येत नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीनां अधिकार आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्याच्या ज्या भावना आहेत त्या यापुढे मा. आयुक्तांच्या कानावर घालतो.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही कानावर घाला पण आजची सभा तहकूब करा. मा. आयुक्तांना बोलवा नाही तर, आजची सभा तहकूब करा.

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. उपआयुक्त असे ठोस निर्णय जर घेउु शकत नसेल तर मा. आयुक्तांनी लेखी द्यायचे की, तुम्ही ठोस निर्णय घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ह्यापुढे लेखी घेण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

हे तुम्हाला कोणी सांगितले. हा अधिकार कोणी दिलेला आहे की, लेखी घेण्यात येणार आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. आयुक्तांनी सांगितले.

**शशिकांत भोईर :-**

तुम्हाला मा. आयुक्तांनी लेखी दिले आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी त्याच्याकडुन लेखी लिहुन घेईल ना.

**शशिकांत भोईर :-**

आम्ही तुमचे ऐकुच शकत नाही. तुमचेकडे पत्रच नाही की, तुमची नियुक्ती या सभेत झाली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तोंडी सांगितले आहे आणि काही गोष्टी प्रत्येक वेळेस.........

**जयंत पाटील :-**

आपण तोंडी - तोंडी असे काय बोलता? ही सभा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पानपट्टे साहेब, आपण कृपया बोलु नका सन्मा, सचिव साहेब आपण खुलासा करावा. विनाकारण वाद विवाद नको आरग्युमेन्टस नको. तुम्ही पटकन खुलासा करा. आम्ही जे विचारले आहे त्याचा खुलासा करावा.

**शशिकांत भोईर :-**

अन्यथा आम्ही तुमच्यावर बोट दाखवू.

**नगरसचिव :-**

लेखी आदेश घेणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

लेखी दिलेले नाही मग, आता ही मिटींग करायची की, नाही करायची. कायदेशीर आहे की, बेकायदेशीर आहे हे तुम्ही पटकन सांगा.

**नगरसचिव :-**

काही अडचणी मुळे मा. आयुक्त हे बाहेर गेलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्तांच्या अडचणी मान्य आहेत.

**मा. सभापती :**

सन्मा. सदस्य काय विचारतात तर कायद्यामध्ये आहे की, नाही? ते सांगा.

**नगरसचिव :-**

कायदेशार आहे.

**मा. सभापती :**

कायदेशीर आहे. मग बस झाले.

**जेन्वी अल्मेडा :-**

सन्मा. सचिव साहेब, आता मा. कमिश्नर साहेब नाही व मा. उपआयुक्तांना तोंडी सांगितले आहे. पण कायद्या नुसार असे आहे की, स्टॅण्डींग सभापतींना देखील त्यांनी तसे लेखी पत्र द्यायला पाहिजे की, आम्ही कामास्तव बाहेर जात आहे. तर असे मा. सभापती साहेब आपल्याला काही सुचना दिल्या आहेत का?

**मा. सभापती :**

मला काहीच इन्टीमेन्ट नाही? मला असे काहीच माहित नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्तांनी जेव्हा तुम्हाला असे अधिकार दिले तर ते ॲड्ररेस सभापतींना करुन ती कॉपी तुम्हाला सभापतीला किंवा आजच्या ह्या सभेला मी उपस्थित राहु शकत नाही. मा. उपायुक्त पानपट्टे हे कामकाज सांभाळतील अशी त्यांनी एक कॉपी द्यायला पाहीजे होती. हे रितसर झालं, ह्याच्यात सभापतीचं...........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सभापती साहेब, आले आहेत. मिंटीग कन्डक्ट करा म्हणुन त्यांचा फोन आला होता.

**शशिकांत भोईर :-**

असे नही. फोनवरुन नाही. सभापती साहेब, असताना हा आपला अपमान आहे. आपली परवानगी घेतल्याशिवाय ते सुट्टीवरही जाउ शकत नाही. एवढं लक्षात ठेवा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही ही प्रत्येक गोष्टी या महानरपालिकेच्या अधिनियमा प्रमाणे चालायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त असतांना मा. उपआयुक्त कशाला? मा. आयुक्तांना बोलवा.

**शशिकांत भोईर :-**

आपला जो पायंडा पडलेला आहे तो चुकीचा आहे. त्याचा गैरफायदा अधिकारी घेत आहेत. साहेब, आपण आतापासुन सुधारु. सन्मा. सभापती साहेब, आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये असा मॅसेज गेला पाहिजे की हे सभापती आले व त्यांनी काहीतरी नियमाचा आणि कलमाचा अभ्यास व पालन केलेला आहे आणि त्या नुसार त्यांनी त्या अधिका-यांना सुधरवलेले आहेत. अन्यथा असेच कोणी पण अधिकारी येतील .नंतर आपण जे ठराव केलेले असतात ना नंतर ते लोक आपल्याला मा. आयुक्तांकडे पाठवतात. मा. आयुक्त जर उपस्थित असतील तर त्यांनी इथे यावे.

**मा. सभापती :**

या गोष्टींशी मी सहमत आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आपल्याकडे माझी ही विंनती आहे की, जे मसुरी येथे झालेले प्रशिक्षण इथे काही राहिलेले नगरसेवक परत त्यांना अभ्यास आणि त्यांना परीपक्व करण्यासाठी घ्या.

**मा. सभापती :**

ठिक आहे आपण घेउ या.

(नगरसचिवांनी प्रकरण १४९ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

विषयाला सुरूवात होण्यापूर्वी मी मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सभापती साहेब या पाण्यामध्ये आजकाल आग पण लागू शकते. कारण दिवसेंदिवस ही समस्या जटील होत चालली आहे. आणि आपल्या आस्थापनेमध्ये बरेच अधिकारी असताना त्यांच्या मनमर्जी प्रमाणे बदल्या केल्या जातात.

त्या बदल्या करण्याचा अधिकार जरी मा. आयुक्तांना असला तरी तो कोणत्या अधिनियमाखाली याचा ही त्यांनी खुलासा करावा. तसेच, आपल्या या मिरा-भाईंदर क्षेत्रासाठी लाभलेले शहर अभियंता यांची कार्यप्रणाली काय आहे. ते कोणती विभागासाठी कार्य करु शकता त्याचाही खुलासा केला तर बरे होईल. कारण जे काही आम्ही साडे चार वर्षांपर्यंत पाण्यासाठी किंवा गटारे, रस्त्यासाठी भांडत आलेलो आहोत प्रशासनाच्या जोडीला आणि कामे केलेली आहेत. आज उठून सुटून कोणीही उभे राहील आणि पाण्यासाठी मोर्चे वगैरे येतात. आणि आम्ही काहीच कामे करीत नाही असे एक मॅसेज आमच्या या जनतेला जात आहे. आणि आमच्या नावाची खराबी होत आहे. या बद्दल पाणी पुरवठा विभागातील अधिका-यांनी खुलासा करावा की, ही पाण्याची समस्या तुमच्याने सॉल्व्ह होणार की नाही. तुम्ही वॉलमेनच्या बदल्या करता. तुमच्या मेस्त्रीची बदली करता. तर मा. आयुक्तसाहेब हे कोणत्या अधिनियमाखाली त्यांची बदली करतात त्याचाही खुलासा करावा.

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेब, याबाबत आपण खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये सर्व स्थायी समितीच्या सन्मा. सभासदांना विनंती करेन की, विषयाला धरून जे काही असेल ते फक्त मी आपल्याला सांगेल. विषयाच्या अगेन्स जर चर्चा करायची असेल तर त्याच्या साठी आपण पुन्हा सभा घेउ. तुम्ही जेव्हा सांगाल तेव्हा मी तुम्हाला वेळ देईल.

**जयंत पाटील :-**

पण आता नियम तरी सांगा ना.

**मा. आयुक्त :-**

नाही. नाही, मी काय सांगितले तुम्हाला विषयाला धरून जे काही असेल ना तर त्याच्या बाबतीमध्ये मी खुलासा करेन. विषयाच्या व्यतिरिक्त जर असेल आणि एखादा ज्वलंत प्रश्न असेल तर मी तुमच्या पूर्ण सहकार्य करायला तयार आहे.

**शशिकांत भोईर :-**

हा पाण्याच्या विषयी ज्वलंत प्रश्न आहे. पूर्ण मिरा-भाईंदर शहरासाठी उपस्थित झालेला प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यासाठी आपल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये जे विषय आहेत त्याच्यावर आपण चर्चा करु या. त्यनंतर आपण या विषयावर चर्चा करु या.

**जयंत पाटील :-**

स्थायी समितीमध्ये जे काही विषय आलेले आहेत. ते शहराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेतच. परंतु, याच्यापेक्षा अति महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पाण्यासारखा आहे व तिथे चर्चा होत नसेल तर आपल्या केबिनमध्ये करा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. जयंत पाटील साहेब, माझी सभागृहाला एवढीच विनंती राहील की मी चर्चा करायला तयार आहे. मी चर्चा करणार नाही असे मी म्हटलेले नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, या शहरातील....

**मा. आयुक्त :-**

अजेंड्यावर जे विषय आहेत त्याविषयावर आपण चर्चा करु या. नंतर मी तुम्हाला वेळ देतो ना.

**जयंत पाटील :-**

साहेब, असे म्हणणे आहे की, या शहरातील चांगले कर्मचारी ठिक आहे. तुमचे अधिकार कोणत्या अधिनियमात आहेत हे आम्हाला माहित नाही. परंतु, स्थायी समितीच्या अधिन राहून आपण ती बदली करायला पाहिजे. असे आमचे म्हणणे आहे आपण या शहरातील पाण्याचे चांगले अधिकारी इकडचा तिकडे, तिकडचा इकडे केला. त्याच्यामुळे आमच्या भाईंदर पूर्वेला जो अधिकारी होता. चांगला अधिकारी होता. त्याची बदली करण्याचे काहीच कारण नव्हते. एकाची बदली करण्यासाठी तुम्ही दुस-याची बदली केली.

**मा. आयुक्त :-**

या बाबतीमध्ये तुम्हाला जर चर्चाच करायची असेल तर त्या चर्चेला माझी पूर्ण तयारी आहे. मी असे म्हणणार नाही की, मी तुमच्याशी चर्चा करणार नाही. परंतु, माझी तुम्हाला इतकीच विनंती आहे की, अजेंड्यावर जे विषय आलेले आहेत. ते पहिल्यांदा आपण घेउया. त्यानंतर आपण चर्चा करु या ना.

**जयंत पाटील :-**

या शहरामध्ये एक अधिकारी गेले ३ महिने अधिकारी म्हणून राहूच शकत नाही. काल तो तुमच्या डायसवरून आम्हाला माहिती देत आहे. ३ महिने तो प्रतिनियुक्तीवर आलेला तो माणूस, एक अधिकारी ३ महिन्यात त्याची मुदत संपलेली आहे. त्याची मुदतवाढ झालेली नाही. शासनाने मंजूरी दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या बाबतीमध्ये काल सभागृहात चर्चा झाली होती.

**जयंत पाटील :-**

काहीच चर्चा झाली नाही. फक्त तुम्ही माहिती दिली.

**मा. आयुक्त :-**

जर चर्चा झाली नव्हती तर तुमचे समाधान होईपर्यंत तुम्ही सभागृहाला विचारायला पाहिजे होते.

**जयंत पाटील :-**

त्याबाबतीत आपले म्हणणे काय हे आपण सांगा ना.

**मा. सभापती :-**

कारण, आता या बाबतीमध्ये मी काहीच बोलणार नाही. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब काल मा. महासभेमध्ये जी चर्चा झाली आहे त्या चर्चेवरून असे झाले की, तुम्ही जेव्हा गप्प झाले किंवा शांत झाले. याचा असा अर्थ की तुमचे समाधान झाले.

**जयंत पाटील :-**

कसले समाधान झाले.

**मा. आयुक्त :-**

आता ते मला काय माहीत आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही सांगा ना मला या सभागृहाला सांगा.

**मा. आयुक्त :-**

नाही, मी काय तुम्हाला सांगतो.......

**जयंत पाटील :-**

तुम्हा या सभागृहाला सांगा ३ महीने झाले प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-याची मुदत संपलेली आहे. आणि मुदत वाढ तुम्ही घेतलेली नाही. हे तर मंजुर आहे. शासनाने मंजुरी दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

अशा पद्धतीची जर चर्चा होत असेल एका बाजुला तुम्ही पाण्याचा प्रश्न काढता दुस-या बाजुला तूम्ही वेगळीच चर्चा करत आहात नेमकी आपल्याला कुठल्या संदर्भात चर्चा करायची आहे. म्हणजे त्या चर्चेसाठी मी तुम्हाला वेळ देतो ना. मी नाही असे म्हणतच नाही आपल्याला माझी विनंती अशी राहील की विषयपत्रिकेवर जे विषय आहेत. ते तुम्ही पाहिल्यांदा घ्या ना.

**जयंत पाटील :-**

त्या अधिका-याच्या केबिनला जर आम्ही कुलूप ठोकले तर आपले काय म्हणणे आहे?

**मा. आयुक्त :-**

बघा, लोकशाहीमध्ये..........

**जयंत पाटील :-**

लोकशाही नाही.

**मा. आयुक्त :-**

लोकशाही मध्ये तुम्हाला जे अधिकार असतील त्या अधिकारांचा तुम्ही वापर करु शकता.

**जयंत पाटील :-**

लोकशाही नाही, नियमा प्रमाणे तो अधिकार या महापालिकेमध्ये पाय टाकु शकत नाही कारण तो आज आमचा कर्मचारी नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा सदस्य पाटील साहेब या ठिकाणी कोणालाही धमकावयाची गरज नाही. आणि धमकावण पण योग्य होणार नाही.

**जयंत पाटील :-**

धमकावतोय कोण?

**मा. आयुक्त :-**

असे नाही ना.

**जयंत पाटील :-**

मी, नियमा प्रमाणे बोलत आहे.

**मा. आयुक्त :-**

पण, असे नाही.

**जयंत पाटील :-**

मी तुम्हाला काय धमकी दिली? या महानगरपालिकेचा जर तो कर्मचारीच नसेल तर तो येउन केबीन मध्ये कसा बसू शकतो?

**मा. आयुक्त :-**

काल या संदर्भात मा. महासभेत चर्चा झाली आहे.

**जयंत पाटील :-**

काहीच चर्चा झाली नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेत चर्चा झाली. तुम्ही असे काय म्हणता?

**जयंत पाटील :-**

फक्त एकच विषय विचारला गेला की, मुदत कधी संपली आहे.

**मा. आयुक्त :-**

ती जी मुदत संपलेली होती त्या मुदती बद्दल सभागृहाला त्यांनी सांगितले.

**जयंत पाटील :-**

मंजुर.

**मा. आयुक्त :-**

आणि त्याच्यानंतर मुख्यालयाच्या मा. उपआयुक्तांनीसुद्धा सभागृहाला सांगितले.

**जयंत पाटील :-**

त्यांनी काय सांगितले हे तुंम्हाला ही माहित आहे आणि आम्हालाही माहित आहे. शासनाने त्यांना मंजुरी अजुन दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

कोणाला?

**जयंत पाटील :-**

महानगरपालिकेमध्ये ठराव झाला व तो ठराव मंजुरी गेल्यानंतर त्यास कुठे मंजुरी मिळालेली आहे? मी घेवारे यांच्याबद्दल बोलत आहे.

**मा. आयुक्त :-**

होय ना.

**जयंत पाटील :-**

तुमच्या लक्षात आले.

**मा. आयुक्त :-**

माझ्या लक्षात आलेले आहे.

**जयंत पाटील :-**

दि. ९/९/२००६ ला त्याची मुदत संपली. मंजुर, मग ते आता कसे राहू शकतात.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्याकडे त्यांच्या बाबतीचा जो काही प्रस्ताव आहे. तो प्रस्ताव आपण शासनाकडे पाठवलेला आहे. त्याला सभागृहाने मान्यता दिली आहे तो प्रस्ताव सभागृहाच्या मान्यतेने शासनाकडे पाठवलेला आहे. शासनस्तरावर त्याच्या बाबतीमध्ये अजून निर्णय झालेला नाही.

**जयंत पाटील :-**

इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आपण अशीच भुमिका घेणार का?

**मा. आयुक्त :-**

कोणाच्या?

**जयंत पाटील :-**

इतर कोणताही कर्मचारी ज्याची मुदत संपली असेल आणि त्याची मुदत वाढ झालेली नाही तर तेव्हा तुम्ही अशीच भुमिका घेणार?

**मा. आयुक्त :-**

जर मुदत वाढ संपली असेल त्याच्यावरती जर कुठल्याप्रकारे जर समजा, महानगरपालिकेच्या स्तरावर कुठल्या प्रकारची त्याच्यावरती अपॉईंटमेंटच्या बाबतीमध्ये किंवा मुदत वाढीच्या बाबतीमध्ये म्हणजे जर समजा कुठल्याही प्रकारची प्रक्रिया झाली नसेल तर त्यांना रिन्यु करावे लागेलच ना?

**जयंत पाटील :-**

महानगरपालिकेने मंजुरी दिली तरी त्याला शासनाची मंजुरी लागते ना.

**मा. आयुक्त :-**

होय, शासनाची मंजुरी........

**जयंत पाटील :-**

शासनाने मंजुरी कुठे दिली आहे.

**मा. आयुक्त :-**

तेच तर तुम्हाला सांगतो. शासनाकडे मंजुरीला प्रस्ताव पाठविला आहे.

**जयंत पाटील :-**

तीन महिने झाले तो माणूस आपल्या महापालिकेल येतो आणि तो आमचा कर्मचारी नाही. आमचे कर्मचारी नाही आणि ते आमच्या गाड्या वापरतात. हे सर्व रोजचच चाललेल आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असा खुलासा करा की, शासनाने परवानगी अजुनपर्यंत दिलेली नाही म्हणजे मंजुरी दिलेली नाही. बरोबर आणि त्याची मुदतही संपलेली आहे. मग अशावेळी काय करायचे त्यांना ठेवायच की, नाही ठेवायचं?

**जयंत पाटील :-**

नियमामध्ये काय आहे ते सांगा ना.

**मा. आयुक्त :-**

जर समजा महापालिकेने त्यांची सेवा एक्सेप्ट केलेली आहे. महापालिकेने त्याची सेवा एक्सेप्ट करुन तो प्रस्ताव फक्त शासनाकडे पाठवलेला आहे. म्हणजे त्यांची सेवा आपण मान्य केली ना. त्यांची सेवा आपण घेणार आहोत हे जर आपण मान्य केलेले असेल तर त्याला फक्त टेक्निकल बाब जी आहे त्याला शासनाची मंजुरी आहे. त्यासंदर्भामध्ये पाहीजे तर हे आपले स्थायी समितीची सभा अटोपल्यावर मी सेक्रेटरी साहेबांशी दुरध्वनीवर बोलुन घेतो की, अशा परिस्थितीत काय करायला पाहीजे.

**जयंत पाटील :-**

म्हणजे याचा अर्थ असा की, शासनाची मंजुरी लागते. हे आपल्याला मान्य आहे.

**मा. आयुक्त :-**

मान्य आहेच ते. आहे ना.

**जयंत पाटील :-**

जोपर्यंत शासनाची मंजुरी मिळत नाही तोपर्यंत ते अधिकारी त्यापदावर राहू शकतात का? त्याठिकाणावर, त्या जागेवर?

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला सांगितले आहे ना त्यांची सेवा समजा जर आपण स्विकारायचे मान्य केले आहे.

**जयंत पाटील :-**

मी असे म्हणत आहे. माझे असे म्हणणे आहे की, हा नियम आपण इतर कर्मचाऱ्याच्या बाबतीत लावणार का? प्रत्येकवेळी सभेमध्ये जेव्हा विषय घेतो तेव्हा शासनाकडे मंजुरीला गेलेले आहेत असे तुम्ही म्हणता. तोपर्यंत आपण त्याची भरती करत नाही.

**मा. आयुक्त :-**

कोणाची सांगा ना.

**जयंत पाटील :-**

पदनिर्मिती असो किंवा इतर काही गोष्ट असो. अनेक गोष्टी आहेत.

**मा. आयुक्त :-**

पदनिर्मिती आणि जे काही तुम्ही श्री. घेवारे यांच्याबाबत बोलत आहात तर श्री. घेवारेयांच्या पदाबाबत जे तुम्ही बोलत आहात ते.......

**जयंत पाटील :-**

त्यांना आस्थापनेवर घेण्याबद्दल तुम्ही शासनाची मंजुरी मागितलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

होय.

**जयंत पाटील :-**

पण, ते मंजुर झालेले नाही.

**मा. आयुक्त :-**

नाही ना आले.

**जयंत पाटील :-**

त्यांची तुम्ही मुदत वाढ घ्या. त्यांची तुम्ही मुदत वाढ घेत नाही. त्यांची मंजुरी ही तेथुन येत नाही.

**मा. आयुक्त :-**

तेच सांगितले की, आता आपली मिटींग संपल्यावर मी सन्मा. सचिवांशी बोलतो की, ह्या बाबतीमध्ये काय करायला पाहीजे. त्यांना परत पाठवायचे की, त्यांना सेवेमध्ये ठेवायचे?

**जयंत पाटील :-**

आमचा तो विषय नही. तुम्ही सन्मा. सचिवांशी बोला किंवा बोलू नका आमचा विषय असा आहे की, तीन महिने झाले ते आमचे कर्मचारी नाही आहेत त्याची मुदत संपलेली आहे. आमचा सरळ हा विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

अशी तरतुद असेल तर सविस्तर सांगा उगाचच संभ्रमातील वातावरण निर्माण करु नका. ऐकून घ्या. अन्य - अन्य महापालिकेमध्ये समजा, आपली मिरा भाईंदर महानगरपालिका ह्याच्याआधी आपण कोणाला ठेवले किंवा आज ठाणे महानगरपालिकेमध्ये असे अधिकारी आहेत. म्हणजे अजुनही त्यांना शासनाची परवानगी येणे बाकी आहे. असे असेल तर तसे सांगा अन्यथा तुमचेही समाधान होणार नाही. आणि सभा सस्पेन्समध्ये राहील.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य पण आपले समाधान झाले का?

**रोहिदास पाटील :-**

नाही ना.

**मा. सभापती :-**

त्याचे समाधान होणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांचे समाधान होणार नाही आणि आमचही होणार नाही.

**मा. सभापती :-**

तर तुम्ही सांगा ना माझही समाधान होणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

सगळे संभ्रमात राहण्यापेक्षा साधारण शासकिय कामामध्ये अशी प्रथा आहे आणि त्यांनी घेतलेला निर्णय, त्यांनी केलेले कामकाज, त्यांच्यावर केलेला खर्च हा ग्राह्य धरला जातो जसे त्यांनी अधिकाऱ्याचा प्रश्न उभा केला आहे. तसाच तो उद्या ऑडीटचा प्रश्न उभा राहील. त्याला दिलेली सॅलेरी, त्यांनी घेतलेली सॅलरी. त्यांच्यावर केलेला खर्च तो नियमात आहे की नियम बाह्य आहे. त्यामुळे तो मनातून निघुन जाईल ना. एक त्यातल काय असेल ते तेवढे सांगितल तर सोपे जाईल ना.

**मा. आयुक्त :-**

कालच मा. महासभेत आपली याबाबत चर्चा झाली. आज खर म्हणजे या संदर्भामध्ये मी सन्मा. सचिवांना विचारणारच होते की याबाबतीमध्ये की अशावेळेला नेमक काय करायला पाहीजे ते जर म्हणाले की त्यांना परत पाठवायचे तर त्यांना परत पाठवता येईल. तुमच्या समोर मी त्यांना विचारतो ना.

**जयंत पाटील :-**

साहेब, आयुक्त आहेत. साहेबांना उत्तर माहित असेल कारण आम्हाला माहित नाही म्हणून आम्ही आपल्याला विचारतो.

**मा. आयुक्त :-**

मी काय म्हणालो की, तुमचे ही समाधान आणि माझे ही समाधान होईल आपल्या समोरच मी सचिवांना फोन करतो.

**जयंत पाटील :-**

ते तीन महिने आपल्याकडे कोण आहे हे मला सांगा. ते त्या केबिनमध्ये बातात त्यांनी मारलेले शिक्के व त्यांनी मारलेले थप्पे त्यांनी दिलेली मंजुरी हे ग्राह्य आहे का? या तीन महिन्यामध्ये

**मा. आयुक्त :-**

त्याबाबतीमध्ये सन्मा. सचिवांनी जर सांगितले की त्यांची मुदत वाढ तुम्ही घ्यायला पाहिजे होती किंवा त्यांना मुदत वाढ मिळाली नाही. जर, समजा जे काही मा. महासभेने ठराव करुन त्यांच्या सेवा ज्या काही घेण्याचे धोरण ठरवलेले आहे. त्या धोरणाला फक्त मान्यता मिळायची आहे. त्याबाबतीमध्ये मा. सचिव सांगतील तुमच्या समोर मी त्यांना फोन करतो.

**शशिकांत भोईर :-**

पाणि पुरवठ्याबाबतचा हा जो प्रश्न आहे मघाशी विषय डायव्हर्ट झाला. पाणी पुरवठ्याचं अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे आणि तो समस्या सॉल्व्ह होईल की नाही?

**रोहिदास पाटील :-**

पाणी पुरवठ्यामध्ये हा विषय निघाला असेल तर मी तुम्हाला असे विचारतो की, तुम्ही त्यादिवशी आम्हाला सभागृहात आश्वसन दिले की, विधान परिषदेमध्ये झालेल्या कामकाजाचा जो काही पत्र व्यवहार झाला. जी काही अनाउन्समेंट झाली ३५ एम. एल. डी., ४० एम. एल. डी. कोणीही केले. त्याचे आम्ही मुख्यमंत्र्यांना धन्यवाद दिलेले आहे. पण डॉक्युमेंट आपल्याकडे आले की नाही?

**मा. आयुक्त :-**

आपण पाणी पुरवठ्याच्या संदर्भामध्ये चर्चा ही काही ५-१० किंवा १५ मिनिटात चर्चा संपेल अशातला काही भाग नाही. मी पुर्ण चर्चा करायला तयार आहे ना. पण, पहील्यांदा विषय पत्रिकेवर जे विषय आहेत ना त्याच्यावर चर्चा करुया त्यानंतर या विषयावर आपण पर्ण वेळ चर्चा करुया. भले दोन तास लागतील तीन तास लागतील. आपण त्यावर चर्चा करुया. मी तुम्हाला वेळ देतो.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण आम्हाला वेळ द्यायचा आहे.

**मा. सभापती :-**

परवानगी आहे.

**रोहीदास पाटील :-**

ही मिटींग संपल्यावर पुढचा विषय घेउु.

**मा. आयुक्त :-**

आपण इथेच चर्चा करु.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४९चे वाचन झालेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मंजुर, पुनर्नियोजन मंजुर.

**मा. सभापती :-**

पुढे बोला.

**रतन पाटील :-**

कुठला विषय आहे. जरा थांबा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पुनर्नियोजन भ्रमणध्वनीचा विषय आहे.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**रतन पाटील :-**

त्यावेळेला आपसात ठरले होते की, आपल्या स्टॅण्डींगच्या सदस्यांना टेलिफोन देणार होते हे बोलत नाही. तो विषय तुम्ही पुढे घालवत आहात सांगा ना. तो करा त्यात तो विषय घ्या ना. नंतर ते मंजुर करा. त्याला आमची हरकत नाही पण, आपले सुद्धा बघाना. स्टँडींगच्या सदस्यांना तुम्ही टेलिफोन देणार होते. ते सुद्धा दिले गेलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

मागे या संदर्भात चर्चा झाली होती ना?

**रतन पाटील :-**

साहेब, आम्ही पुनर्नियोजनसाठी मी काही विरोध करीत नाही. पण स्टँडींग सदस्यांना आपण जे मोबाईल देणार होते त्याचे काय झाले. ते कुठे अडकल? का तुम्हाला मोबाईल द्यायचे नाहीत?

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये सन्मा. स्थायी समितीच्या सदस्यांना दुरध्वनी, भ्रमणसेवा देण्याबद्दल मागच्यावेळेला जी चर्चा झाली होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने मला वाटते की, समाधानकारक चर्चा झाली होती कारण तेव्हा आपल्याला असे सांगण्यात आले होते की, जे हे काही पदाधिकारी आहेत, स्थायी समितीचे सभापती असतील त्याचप्रमाणे.....

**मा. सभापती :-**

प्रभाग अध्यक्षांना ही दिले होते का?

**मा. आयुक्त :-**

होय, जे पदाधिकारी आहेत त्या सर्व पदाधिकाऱ्यांना दिलेले आहे. परंतु, जर समजा सगळ्या आज आपण स्थायी समितीच्या सगळ्या सदस्यांनी मागणी केली तर उद्या मा. महासभेमध्ये म्हणतील की, सगळ्याच सदस्यांना दुरध्वनी द्या. तर या बाबतीमधले जर धोरण ठरवायचेच असेल तर आपण मा. महासभेत विषय मंजुर करुन घेउुया आणि सगळ्यांनाच देउुन टाकुया.

**रतन पाटील :-**

साहेब, ही पळवाट नाही का?

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ही पळवाट आहे.

**रोहिदास पाटील :-**

म्हणूनच असा विषय आला की, स्थायी समितीच्या बैठकीला मा. आयुक्त साहेबच असावेत हा विषय योग्य ठरला आता कारण ह्याच्या अधिच्या ज्या दोन स्टँडींग झाल्या. दोन स्टँडींगमध्ये नक्की निर्णय ठरला की, या सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना टेलिफोन द्यावेत. सन्मा. सभापती साहेब आम्ही सर्व सदस्य आपल्या......

**मा. आयुक्त :-**

द्यावेत, असा निर्णय झाला आहे ना.

**रोहिदास पाटील :-**

असा निर्णय झाला. तेव्हा मा. खतगांवकर साहेब बसायचे आणि मा. खतगांवकर साहेबांच्या समोर आम्ही तुमच्या केबीन मध्ये आलो. तुमच्या केबिनमध्येही झाले आणि नंतर सांगतात की मा. आयुक्त नाही म्हणून सांगतात. आता एकदा तुम्ही ते नियमात आहे तर होय सांगा. नियमात नाही तर नाही सांगा. आम्ही आमचे टेलिफोन घेउुन आलेलो आहोत. आमची स्पष्ट अपेक्षा आहेत की, मा. आयुक्त, मा. उपआयुक्त, प्रत्येक सन्मा. सभापती ते टेलिफोन घेउुन आलेलेच आहेत. पण, एक सोय म्हणून एक व्यवस्था म्हणून जसे अन्य पदाधिकाऱ्यांना तुम्ही अधिकाऱ्यांना पदाधिकाऱ्यांना दिली. स्थायी समितीच्या सदस्यांना द्यावे. अशी त्यांची इच्छा

होती. आणि ते सर्व एकमताने ठरले होते. आणि त्याची दोन वेळा बैठक झाली. आता तुम्ही सांगाल की, तो ठराव करुन तुम्ही मा. महासभेत द्यावे तर ते किती योग्य ठरेल?

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला काय म्हणतो की, जर समजा, स्थायी समितीमध्ये जर असा निर्णय झाला असेल की, प्रत्येक सन्मा. सदस्यांना एक-एक भ्रमणसेवा इनस्ट्रुमेंट द्यायचे आणि कार्ड टाकुन द्यायचे तर त्या संदर्भामध्ये जर समजा, द्यायचेच असेल तर माझी त्याला काही हरकत नाही. मी नकार देतच नाही. जर आपण निर्णय घेतलेलाच असेल तर त्याला माझा नकार राहणारच नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपआयुक्त साहेबांनी तसे सांगितले.....

**रोहिदास पाटील :-**

आपण येथपर्यंत क्लेरिफिकेशन केले की, इनस्ट्रुमेंट आम्ही देवु शकतो व बिल तुम्ही भराल की, नाही. बिल आम्ही देवु शकतो. इनस्ट्रुमेंट तुम्ही घ्या. अशी सगळी चर्चा झाली होती. त्यामुळे कोणीतरी इनस्ट्रुमेंटवर फार अवलंबून आहे. अशातला भाग नाही. त्याच्यात आमच्या भावना दुखावतात. इथे आम्ही मागतो मागतो असे वाटते. देण योग्य वाटत असेल तर ठिक आहे. नसेल तर नको आहे. इथेच विषय संपवा.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये आपण असे म्हणत आहात तर इतर महानगरपालिकेमध्ये काय पद्धत आहे किंवा इतर महानगरपालिकेमध्ये तशाप्रकारे सर्वांना दिलेले असेल तर आपण सर्वांना देउया.

**रोहिदास पाटील :-**

तोपर्यंत आमची मुदत संपेल आणि आपण पुढच्या लोकांसाठी तयार करुन ठेवा.

**एस. ए. खान :-**

इतर महानगरपालिकेमध्ये विचारायला लागेल की, कोणाला दिल आहे की नाही?

**शशिकांत भोईर :-**

पुनर्नियोजनाचा विषय आलेला आहे तेव्हा घेवु शकता ना. याच्यात तरतुद घेवु शकता ना. साहेब, प्रशासनाने दिले नाहीतरी आम्ही त्याच्यावर अवलंबून नाही. आमच्या जवळ दोन दुरध्वनी आहेत. आम्हाला त्याची एवढीच सोय होईल की, रिलायन्स टू रिलायन्स आम्हाला १५ पैसे मिळतात त्याचा ते आम्हाला फायदा होवु शकतो.

**रोहिदास पाटील :-**

ज्यांचे महानगरपालिका बिल भरते त्यांचेही फोन वाजत नाही.

**प्रकरण क्र १४९ :-**

महानगरपालिकेचे दुरध्वनी व भ्रमणध्वनी तसेच जाहिरातीचे देयक अदा करणेकामी येणाऱ्या खर्चाचे पुर्नःविनियोजन विवरण पत्रकास मंजुरी देणे बाबत.

**विषय :-** **मा. आयुक्त सो। यांनी शिफारस केलेल्या पुर्नःविनियोजन विवरण पत्रकास मंजूरी देणे बाबत.**

**ठराव क्र १५३ :-**

महानगरपालिका कार्यालयात कार्यान्वित असलेली दुरध्वनी सेवेचे देयके प्रदान करणेकामी (अ) सामान्य प्रशासन आणि वसुली खर्च (१) नविन दुरध्वनी व्यवस्था या लेखा शिर्षा अंतर्गत रु.५,००,०००/- ची तरतुद करण्यांत आलेली असून आजतागायत झालेल्या खर्चातून रु. ५,००,०००/- तरतुद संपून जादा खर्च होण्याची संभावना आहे. तसेच महानगरपालिकेने अधिकारी / पदाधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाकरीता भ्रमणध्वनी दिलेले आहे. सदर भ्रमणध्वनीचे येणारे देयक अदांजपत्रकातील तरतुद (अ) सामान्य प्रशासन वसुली खर्च (२) दुरध्वनी बिल या लेखा शिर्षा अंतर्गत रु.१०,००,०००/- तरतुद करण्यांत आली असून आजतागायत झालेल्या खर्चातून रु.६४,४२७/- इतकी रक्कम शिल्लक आहे. तसेच नव्याने खरेदी केलेले भ्रमणध्वनी यांची बिलांची रक्कम पाहता अंदाजपत्रकीय तरतुद कमी पडणार आहे.

महानगरपालिका विविध विकासाची कामे वृत्तपत्रात, जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करुन निविदेतील दर मागवून केली जातात. अशा जाहिरातीचे येणारे देयक अदा करणेकामी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील तरतुदी (अ) सामान्य प्रशासन वसुली खर्च (१७) जाहिरात देयक अदा करणे या लेखा शिर्षा अंतर्गत रु. १०,००,०००/- तरतुद करण्यांत आली असून झालेल्या खर्चातून रु. २२३/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

महानगरपालिका कार्यालयात कार्यरत असलेली दुरध्वनी, भ्रमणध्वनी ही अत्यावश्यक सेवा असल्याने उपरोक्त लेखा शिर्षाचे पुर्नः विनियोजन करण्याकामी मा. लेखाधिकारी यांच्याशी विचारणा केली असता त्यांनी (अ) सामान्य प्रशासन वसुली खर्च (७) मालमत्ता जाहिर लिलाव या लेखा शिर्षा अंतर्गत रु. ८,००,०००/- तरतुद करण्यांत आली असून सदर रकमेतून ७,००,०००/- तरतुद वर्ग करण्यास सुचविले आहे.

तरी सदर कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, अनुसुची ड मधील प्रकरण ७ नुसार सदर रक्कमेचे पुर्नःविनियोजन करण्याच्या विवरण पत्रकास ही सभा मंजुरी देत आहे.

# नमुना क्रमांक १०
# नियम ३० (३) पहा
# मिरा भाईंदर महानगरपालिका

| या शीर्षातून | | | | | | ह्या शीर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान गौण व तपशिलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वैगरे | मुळ निधी | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान गौण व तपशिलवार शीर्ष | कामे क्षेत्र इत्यादी | मुळ अनुदान | नोव्हे-५ अखेरपर्यंत झालेला खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | मालमत्ता जाहिर लिलाव कर व खर्च | -- | ८००००० | -- | ८००००० | भ्रमणध्वनी व दुरध्वनी यांच्यासाठी | -- | १०००००० | ९३५५७३ | ६००००० | असामान्य प्रशासन महसुली खर्च लेखाशिर्ष क्र.७ मालमत्ता जाहिर लिलाव करीता सन २००६-०७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात ८ लाखाची तरतुद करण्यांत आली आहे. सदर लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला नाही. सदरचा खर्च हा भ्रमणध्वनी व दुरध्वनी यांच्यासाठी रु. ६ लाख तसेच सामान्य प्रशासन अ (२०) फोटोग्राफी या सदराखाली रु.१५ लाख तरतुद असून नविन दुरध्वनी देयक रु.६२२०००/- इतका खर्च झाला असल्याने सदर शिर्षा खाली रु.२०००००/- तरतुद करणे आवश्यक आहे. तसेच जाहिरात प्रसिद्धीच्या बिलाकरीता रु. ५ लाख वाढविणे आवश्यक आहे. |
| २ | सामान्य प्रशासन (अ) फोटोग्राफी | -- | १५०००००| -- | १५००००० | नविन दुरध्वनी व्यवस्था | -- | ५००००० | ६२२००० मंजूरी अधिन | २००००० | |
| | | | | | | जाहिरात प्रसिद्धीच्या बिलासाठी | | १०००००० | ९९९७७७ | ५००००० | |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकारण क्र. १५०चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, संगणक चालकांचा प्रस्ताव हा मा. महासभेत आला होता आणि मा. महासभेने एकमुखाने ठराव केला की, सदर संगणक चालकांना महानगरपालिकेच्या अस्थापनेवर घ्यायच म्हणून तर आपण तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. तो प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यानंतर त्या प्रस्तावाचे काय झाले त्याबाबत माहिती कोणालाही दिलेली नाही आहे. तो प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहे की, शासनाने आपल्याकडे परत पाठवीला आहे की, शासनाने याच्यावर काय उत्तर दिले आहे तर माझ्या मते सर्व स्थायी समितीच्या सदस्यांना त्याच्या बद्दल काहीच माहीत नाही. तर तसे काय उत्तर आले असेल तर मा. सभापतीसाहेब किंवा मा. आयुक्तसाहेबांनी त्याबद्दल चर्चा करुन सांगावे.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये ती खुलासा करतो की, संगणकाच्याबाबतीमध्ये ठराव झाल्यानंतर तो आपण शासनाकडे पाठवलेला होता. मा. महासभेमध्ये याबाबतीमध्ये ठराव झालेला होता. आणि त्याठरावाप्रमाणे आपण तो शासनाकडे पाठवलेला होता. आणि शासनाने आपल्याला त्यासंदर्भामध्ये गाईड लाईन्स दिलेल्या आहेत की, आउुट सोर्सिंग पद्धतीने संगणक चालकाची सेवा घ्यावी. अशा पद्धतीने आपल्याला त्यांनी लेखी पत्र पाठविलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आउुट सोर्सिंग म्हणजे?

**मा. आयुक्त :-**

बाहेरुन सेवा घ्यायची आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे ते आपल्या मस्टरवरती, आपल्या आस्थापनेवर ते नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, तसे नाही. शासनाने आपल्याला स्पष्ट शब्दात सांगितलेले आहे की, मा. आयुक्त हे सक्षम आहे ते यावर निर्णय घ्यायला सक्षम आहेत. आपण यावर निर्णय घेवु शकतात की, त्यांना आस्थापनेवर घ्यायचे की, नाही. शासनाने काय नियम निर्णय दिला हे शासनाचे कामच आहे. आपण सक्षम म्हणून शासनाने पत्र पाठविले आहे. वाचुन दाखवू का?

**मा. आयुक्त :-**

माझ्याकडे पत्र पाठवून द्या.

**रतन पाटील :-**

ठिक आहे, आपण सक्षम आहात यावर निर्णय घ्यायचा. मा. आयुक्त सक्षम असतानां आमच्याकडे पाठवायची गरजच नव्हती ह्याच्यावर निर्णय घेतील आणि आस्थापनेवर आपल त्यांच्याकडे काम आहे.

**मा. आयुक्त :-**

मी , पत्र वाचुन दाखवतो. उपरोक्त विषयावरील संदर्भातील पत्रानुसार मला असे कळवीण्याचे निर्देश आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ वरील कलम ५१,५३ व५४ येथील तरतुदीत स्वयस्पष्ट आहे. त्यांनुसार वर्ग ३ व वर्ग ४ पदावरील नियुक्तीबाबद मा. आयुक्त सक्षम आहेत. तसेच महानगरपालीकेतील कामे योग्य रितीने पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था उपाययोजना करण्याकरीता आउट सोर्सिंगच्या माध्यमातुन काम कशा प्रकारे करुन घ्यावे. मानधनावर कंत्राटी पध्दतीने कशाप्रकारे नियुक्ती करावी या बाबत मा. आयुक्त महानगरपालिका यांनी निर्णय घेणे अपेक्षीत आहे. सरळ आहे स्पष्ट लिहुन दिल आहे तर तुमच्या मनामध्ये काय शंका आहे?

**रतन पाटील :-**

मना मध्ये शंका नाही . आपण निर्णय घ्यायचा आहे.

**मा. आयुक्त :-**

हो ना, मी कुठे नाही. बोलत आहे.

**रतन पाटील :-**

निर्णय आपण घ्यायचा आहे की, त्यांना आस्थापनेवर घ्यायचे नाही. की, या कंत्राटी पध्दतीवर ठेवायच आहे हा निर्णय घ्यायचा आहे ना.

**मा. आयुक्त :-**

निर्णय घेतो ना.

**रतन पाटील :-**

निर्णय घ्या ना.

**मा. आयुक्त :-**

प्रश्नच नाही. मी निर्णय घेणारच आहे. मी निर्णय घेणारच आहे. माझ्या निर्णयाबद्दल आपल्या मनामध्ये शंका कशाला?

**रतन पाटील :-**

शंका नाही, पण आपण काय निर्णय घेता आणि परत तोच मुद्दा आज येथे........

**मा. आयुक्त :-**

मी काय निर्णय घेणार आहे ते मी तुम्हाला आधिच सांगू का?

**रतन पाटील :-**

नाही ना, साहेब निर्णय घेण्यासाठी सक्षम आहात त्यात नमुद आहे. पण आपण जर निर्णय घेणार असाल तर तो विषय पुन्हा इथे आलेला आहे तर आपण हा निर्णय घ्यायलाच पाहीजे होता. अशी आमची इच्छा होती. पण आमच्या माध्येमातुन आमच्या समोरच जर आपण निर्णय घेत असाल तर एक चांगली गोष्ट आहे. आपण निर्णय घ्या. एक चांगला संदेश जाईल.

**मा. आयुक्त :-**

ह्या आदेशावर जर निर्णय झाला नाही. म्हणुन आपण आपली सेवा बंद करायची का? आपल्याला सेवा चालु ठेवायची आहे आणि ही सेवा चालू ठेवण्यासाठीच हा विषय आपण इथे आणलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, ही सेवा पाहीजेच आणि त्याच्यासाठीच तर आपण सक्षम आहात असे त्याच्यामध्ये लिहलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

बरोबर आहे.

**रतन पाटील :-**

आपण यावर निर्णय घ्या.

**मा. आयुक्त :-**

या बाबती मध्ये निर्णय होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब याच्या मध्ये कलम ५१, ५३ व ५४ दिलेले आहे ते काय ?

**मा. आयुक्त :-**

ते मंजुर पदांच्या बाबतीमध्ये आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मंजुर पदांसाठी म्हणजे कंत्राटी पध्दतीसाठी.

**मा. आयुक्त :-**

मंजुर पदांच्या बाबतीमध्ये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण माग जो मा. महासभेत ठराव पास केला या संदर्भामध्ये तेव्हा ७१ लोकांची नांवे होती पण ॲक्चुअली काम करणारी लोक ५० होती आणि नावे घेतली ७१ जणांची व आजही तेवढी माणसं नाहीत. जे संगणक ऑपरेटर आहेत ती तेवढी माणसे नाहीत.

**मा. आयुक्त :-**

आस्थापनेच कोण आहेत त्यांना बोलवा. आस्थापनेकडे जे ५० कर्मचारी आहेत ते आस्थापना विभागातून असतील ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या डिपार्टमेंटचे इन्चार्ज केसरीनाथ म्हात्रे साहेब आहेत.

**मा. आयुक्त :-**

जर त्यांना माहिती असेल तर त्यांनी सांगु दे ना. त्याला माझी काहीच हरकत नाही.

**केसरीनाथ म्हात्रे :-**

सध्या ७१ संगणक चालक आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्या अगोदर किती होते? तर ५० ना.

**केसरीनाथ म्हात्रे :-**

अगोदर ५६ होते आणि नंतर १५ वाढले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की, ज्यावेळी तो ठराव पास झाला तेव्हा ७१ पदे होती पण ॲक्च्युली तेव्हा काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या होती ५६ आणि नंतर १६ लोकांची नांवे त्यामध्ये घुसवली गेली आणि ७१ लोकांचा ठराव पास झाला. ती १५ लोकांची नांवे त्यात घुसविण्यात आली.

**रोहिदास पाटील :-**

मागे पुढे जाण्यात काही अर्थ आहे का? आपण १०० लोकांचा ठराव दिला आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो वेगळा आहे हा वेगळा आहे.

**रोहिदास पाटील :-**

तो कोणता आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो लिपिकांचा. लिपिकांचा वेगळा आहे.

**रोहिदास पाटील :-**

१०० लिपिक.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

होय आणि हे संगणक ऑपरेटर.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे लिपिक वेगळ आणि संगणक वेगळ आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे संगणक ऑपरेटर आहेत. हे जे गौडबंगाल आहे.

**मा. आयुक्त :-**

ठराव किती लोकांचा झाला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

७१ लोकांचा आणि काम करणारी लोक होती पण ही जी १५-१६ लोक एक्स्ट्रा घुसवली ती कशी काय? आणि अचानक कशी घुसवली प्रशासनाने घुसवली कोणी दुसऱ्याने घुसवीली ते काय आणि अचानक कसे काय घुसवले. प्रशासनाने घुसवली का? कोणी दुसऱ्याने घुसवीली की हे काय?

**मा. आयुक्त :-**

जर हा ठराव मा. महासभेत झालेला असेल तर मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे ७१ ची मंजुरी दिलेली असेल. तर आपण त्याच्यामध्ये ..........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण त्यावेळी साहेब, प्रशासनाकडून जे आलेले होते ना. ते फक्त ५६ कर्मचाऱ्यांचे होते. त्यानंतर ७१ लोकांची नांवे घुसवीली गेली आहेत आणि आता ७१ कर्मचारी कार्यरत आहेत का? म्हात्रे साहेब, पेमेन्ट करतो.

**मा. आयुक्त :-**

प्रत्यक्ष काम करतात की, पेमेन्ट करतो?

**केसरीनाथ म्हात्रे :-**

प्रत्यक्ष कामे करतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ती ७१ जणांची यादी आपण आम्हाला देणार का?

**केसरीनाथ म्हात्रे :-**

होय.

**मा. आयुक्त :-**

आपली सभा संपण्यापूर्वी जर आपल्याला हवं असे तर त्याची एक कॉपी आपल्याकडे देतो. ते काही लपून ठेवण्यासारख काही नाही. कारण शेवटी तुमची मंजुरी दिलेली आहे आणि तुमच्या समोरच द्यायच आहे. अडचण काहीच नाही.

**एस. ए. खान :-**

आपल्या १६ जणांच काय?

**मा. आयुक्त :-**

पण चर्चेच्या अनुषंगाने कुठले प्रश्न विचारले जातील हे सांगु शकत नाही ना.

**एस. ए. खान :-**

आपले संगणकामध्ये एक-एक सदस्य घ्यायचे होते ना.

**जयंत पाटील :-**

संगणक चालक म्हणून आमचे स्टॅन्डींगचे एक मेंबरचे एक घेणार होते.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, थोडस उगाच का कुणास ठाउुक तुम्हाला त्यात काही फायदा नाही. आम्हाला फुकट मानसिक त्रास. या स्टण्डींग मध्ये त्यादिवशी ठराव झाला. मा. खतगावकर साहेबांनी स्पष्ट सांगितले त्यात काही अस्पष्ट, लपुन, अर्धवट असे नाही की, १६ सभासदांचे त्यांनी नावे सुचवायची ते योग्य ते पातळीचे १६ कॅन्डीडेट घेतले जातील. आम्ही ती मुले बोलावली मी जो मुलगा बोलवला होता तो आठ दिवस दररोज येत होता रोज जात होता.

**मा. आयुक्त :-**

कुठल्या ह्याच्यामध्ये.....

**रोहिदास पाटील :-**

संगणकामध्ये आणि आता काय लपुन राहीलेले आहे. काय कशासाठी पण, तुम्हाला काही त्रास आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मला काही त्रास नाही.

**रोहिदास पाटील :-**

बोल एकदाच आरपार

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मला कहीच त्रास नाही

**रोहिदास पाटील :-**

हे सभागृह आहे. आम्ही पोटतिकडीने बोलतो. आमच्या स्वार्थासाठी म्हणा किंवा जनतेच्या हितासाठी म्हणा. जे बोललेलं आहे त्याचे इम्प्लीमेन्टेश्न होत नाही त्याच्यात नंतर आमच्या कडुन कन्फ्यूजन होते कुठूनच जर नीट उत्तर मिळत नसेल तर अर्थ काय आहे? जसे मोबाईलच मगाशी बोलल. असेच झाल तसेच हे १६ लोकांच आहे. १६ लोकांची मुल आणली. ८ दिवस तो मुलगा आला आणि गेला ते ही पुढच्या मिटींग मध्ये सांगितल. मा. खतगावकर साहेब तुम्ही पण सांगितल्या नंतर तो मुलगा ८ दिवस येत होता, जात होता. तो अजुन कामाला लागला नाही. एखादे पालक विचारतात किंवा तो मुलगा विचारतो. त्या मुलाचे आई - वडील विचारतात आणि आपण त्यांना सांगतो की, आता ते कामाला लागतील मी जस सांगितल तसेच अन्य सगळ्या सभासदांनी कोणाला तरी सागिंतल असेल पण, मुलं कामाला लागत नाही. आपल्याला जर ते बजेट मध्ये किंवा नियमात बसत नसेल तर मान्यवरांनी ते आश्वासन ही द्यायला नको? आणि बसत असेल तर एक्झीक्यूशन व्हायला पाहीजे.

**मा. आयुक्त :-**

व्हायला पाहीजे.

**रोहिदास पाटील :-**

तर ते ठिक आहे. आपल्याला ते आवश्यक आहे. चार मुल आधि घेतो, चार मुल नंतर घेतो, आठ मुले या आठवड्यात व आठ मुले पुढच्या आठवड्यात लागून जातील. आणि तुम्हाला आम्ही सगळ्यांना सांगू की, सन्मा. सदस्य गिता बेन ने दिलेल हे नाव सन्मा. सदस्य रविद्रं माळीने दिलेल हे नाव, सन्मा सदस्य रोहिदास पाटील यांनी दिलेल हे नाव त्यात लपवायच काय कारण आहे?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) यांच असे म्हणण आहे. आपण मागच्या स्थायी समितीमध्ये मा. उपआयुक्तांनी आश्वासन दिले आहे की.........

**रोहिदास पाटील :-**

त्या संख्येवरुन ठराव घेतला घेतला.

**मा. आयुक्त :-**

आपल्या येथे किती संगणक आहेत याची आपण माहिती घेतली का? जर २ संगणक असतील तर २० कर्मचारी घेउन उपयोग काय?

**मा. सभापती :-**

माहिती घ्या की, किती संगणक आहेत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण त्या दिवशी संगणक खरेदीचाही ठराव केला होता तेव्हा मा. खतगावकर साहेब असे बोलले की, माझ्या डिपार्टमेंटला रिक्वॉरमेंट आली नाही. तेव्हा मी म्हणालो पाणी खात्यात तर संगणकच नाही. त्यावर त्यांनी सांगितले की ताबडतोब द्यावे. पाणी खात्याला संगणक दिले म्हणजे असे ८ ते १० संगणकांचे लगेच त्यांच्या रिक्वीझेशन साठी त्यांना डिपार्टमेंटच पत्र दिले. १४ कम्प्युटर आल्यानंतर कम्प्युटरसाठी माणसे लागायला पाहिजेत साहेब, म्हणजे उगाच प्रशासन किंवा अधिकारी आणि आमची कारण नजरेत कुठेतरी अंतर दिसते ना.

**मा. आयुक्त :-**

५० लिपीक वेगळे आणि हे संगणक चालक वेगळे संगणक चालकांच्या बाबतीमध्ये काय निर्णय झाला किंवा काय आश्वासन दिले होते?

**रोहिदास पाटील :-**

हा संगणक चालकांचा विषय आहे. संगणक ७२ आहेत तर ७२ संगणक चालक घ्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आता जे म्हणत आहेत की ते ५६ संगणकचालक होते व ५६ चे ७१ कसे झाले. ७१ चे ८५ कसे होतात.

**रतन पाटील :-**

साहेब, यावर खतगांवकर साहेबांनी अशापद्धतीने निवेदन केले की, आपले अजुन संगणक यायचे आहेत व ते आल्यानंतर आपली माणसे घेउ अशा पद्धतीने झालेले आहे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. आता तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आज मा. उपआयुक्त इथे नाहीत. मी त्यांच्याशी चर्चा करीन परंतु, ते आता घ्यायचे आहे की, संगणक आल्यानंतर घ्यायचे आहे. आपले काय म्हणने आहे. मा. उपआयुक्तांनी आश्वासन काय दिले होते ते आपण सांगा.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, १६ संगणक आलेले आहेत ना. संगणक आले म्हणजे मुलांना घ्यायला पाहिजे ना.

**मा. आयुक्त :-**

समजा, जर आपल्याकडे संगणक आलेले असतील तर ते डिस्टीब्युट झालेत का डिपार्टमेन्टला? कुठल्या - कुठल्या डिपार्टमेन्टला गेलेत. सभागृहाला जर मा. उपआयुक्तांनी आश्वासन दिले असेल तर त्याची पुर्तता होईल ना.

**जेन्वी आल्मेडा :-**

सर, पण केव्हा?

**मा. आयुक्त :-**

पहिली गोष्ट म्हणजे बघा. संगणक येण्यापुर्वीच जर आपण असा ठराव केला तर तो तरी योग्य आहे का?

**जेन्वी आल्मेडा :-**

विषय आला म्हणुन बोलण्यात आले.

**मा. आयुक्त :-**

विषय कुठला आला? मी सभागृहाला फक्त एवढेच सांगतो की, समजा, मा. उप आयुक्तांनी सभागृहास जर आश्वासन दिलेले असेल तर त्याची पुर्तता केली जाईल.

**जेन्वी आल्मेडा :-**

साहेब, आश्वासन दिलेले नाही तर त्या संबधी ठराव झाला. सर्वांनुमते ठराव मंजुर झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मी क्लिअर करतो की, जर समजा हा एक १५० नंबरचा जो विषय आपल्या समोर आहे. तो संगणक चालक ठेका पध्दतीने घेण्या करीता नविन वार्षीक ठेका निश्चित करणे हा विषय आहे.आता ह्या विषयाला ठेका निश्चित करायचा की नाही हे ह्याच्यावर निर्णय होण अपेक्षीत आहे.

**रोहिदास पाटील :-**

बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यावर निर्णय होण अपेक्षीत आहे पण तुम्ही जर ह्याच्यामध्ये म्हणत असाल की, आपल्या कडे आज २५ आहेत त्यामध्ये ५० वाढ करा. तर ते संयुक्तिक नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सर, वाढ नाही.

**मा. आयुक्त :-**

असे मी तुम्हाला सांगतो विषयाच्या अनुशंगाने ठराव करणे अपेक्षित आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण, संख्या ही घेतली नाही ना.

**मा. आयुक्त :-**

कशात?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याच्यामध्ये संख्या कुठे घेतली आहे.

**मा. आयुक्त :-**

तो इश्यु नाही. संख्या आहे की, नाही किंवा किती आहे याची मागणी करा. त्याची माहिती सभागृहाला देण्यात येईल. जर समजा आपल्याकडे संगणक चालक ७१ आहेत. त्यांना आपण ठेकापध्दतीने मुदत वाढ दयायला पाहीजे किंवा नविन ठेका पध्दत स्विकारायची की, नाही ह्याच्यावर निर्णय होणे अपेक्षीत आहे. त्यांच्या संख्येमध्ये वाढ करावी हे अपेक्षीत आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब असे आहे की, तुम्ही आता केसरीनाथ म्हात्रे साहेबांना विचारा संगणक आपल्याकडे आलेत का? माझ्या माहिती प्रमाणे १४ संगणक आलेत.

**केसरीनाथ म्हात्रे :-**

मागच्या हफ्त्यात दि. ५/१२/२००६ संगणक आलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मागच्या हफ्त्यात संगणक आलेले आहेत तर त्यांना संगणक ऑपरेटर लागणारच.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, १४ संगणक आलेत मग ऑपरेटर पाहिजेत की नाही?

**मा. आयुक्त :-**

पाहिजेत ?

**रोहिदास पाटील :-**

मग, तेच सांगत आहोत ना. १६ पैकी १६ उद्या पाठवा.

**मा. आयुक्त :-**

आपण ह्याच्यावर अगोदरच कसे काय निर्णय घेता? हे कसे चालणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, १० दिवस झाले आहेत संगणक येउन.

**मा. आयुक्त :-**

ही चर्चा आपण आता कशी काय घेता?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण जर त्याच भुमिकेत चालत असेल तर हे सभागृह पण त्याच भुमिकेने चालत राहिल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा सदस्य मी कुठल्याही भुमिकेमध्ये चालत नाही . मी कोऑपरेट करायला पुर्णपणे तयार आहे. शंभर टक्के तयार आहे. त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही पण वेगळी भुमिकेत चालत नाही. मी वेगळी जिद्द पकडायची आणि मी ही वेगळी जिद्द पकडायची.

**मा. सभापती :-**

तुम्ही आम्हाला कॉऑपरेटच करा तुमच्याकडुन हीच आमची अपेक्षा आहे.

**मा. आयुक्त :-**

माझे म्हणणं एकच आहे की, मा. सभापती साहेब की, जो विषय आपल्याकडे येतो त्या विषयाच्या अनुषगांने ठराव होण आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, तुम्ही आता असे बोललात की, संगणक आले की आपण भर्ती करु मग, आता संगणक आलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

मी जर एवढे सांगितल तर तुम्हाला चर्चा करायची गरज काय आहे.

**जयंत पाटील :-**

मी तेच म्हणतो

**मा. आयुक्त :-**

कशाला चर्चा करायची  काहीच गरज नाही.

**जयंत पाटील :-**

संगणक आलेले आहेत भर्ती करुन टाका.

**ग्रिटा फॅरो :-**

करताना आम्ही जी मुले सांगणार त्यांचीच भरती करा असे ते सांगत आहेत.

**मा. आयुक्त :-**

मॅडम, जर समजा सभागृहामध्ये मा. उपआयुक्तांनी आश्वासन दिलेले आहे किंवा तुम्ही जो ठराव केलेला आहे त्या अनुशंगाने ठरावाची अमंलबजावणी करण्याचे जे त्यांनी आपल्याला सांगितले आहे. सभागृहासमोर ते त्याची अमलबंजावणी होईल ते मी तुम्हाला सांगतो त्याच्यावर चर्चा करायची काहीच गरज नाही

**ग्रिटा फॅरो :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका ) आयुक्तांनी आपल्याला आश्वासन दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती साहेब, मा. आयुक्त साहेब तुम्ही थोडस कमी रागवा कारण की, तुम्ही खुप रागवत आहात. आज प्रथम बघीतल की तुम्ही म्हणजे एवढया मा. महासभा अटेन्ड केल्या पण या स्थायी मध्ये तुम्ही आज आल्यापासुन तलवार काढुन बसल्यात.

**जेन्वी आल्मेडा :-**

प्रथमच आज आलेत म्हणुन.

**मा.आयुक्त :-**

अजिबात नाही. पहिली गोष्ट मला अजिबातच रागावता येत नाही. पण आवाज फक्त जरा मोठा आहे बस तेवढच.

**मा.सभापती :-**

साहेबांनी, आश्वासन दिले नाही तर त्यांनी ॲग्री केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये ७१ संगणकचालक आपण म्हटलेले आहे आणि आता १४ ते १५ संगणक आलेले आहेत. पण हयांच्यासाठीही आपल्याला संगणक चालक लागतील. ते ही याच्यात नमुद करून घ्यावे याच्यात याचे टेंडर काढण्यासाठी ७१ प्लस जे १४ संगणक आले आहेत. त्या संगणक चालकाची नेमणूक करायला लागेल.

**मा.सभापती -**

तो अधिकार आपला आहे आणि आपणच ठराव मांडणार आहेत. मग, नमुद त्याच्यात करुन घेउ.

**मा. आयुक्त :-**

सभापती साहेब काही कारणास्तव मी दोन मिनिटात जावुन येतो. आयुक्त हे माझ्या जागेवर बसतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालयात नागरी सुविधा केंद्र प्रभाग कार्यालय तसेच विविध विभागामध्ये संगणकामार्फत कार्यालयीन कामकाज केले जाते. सदर कामी ७१ संगणक चालक ठेकापध्दतीने घेतले असुन सदर ठेक्याची मुदत दि. ३१/१२/२००६ व दि. ०७/०२/२००६ ला संपणार आहे. महानगरपालिकाच्या विविध विभागात सगंणक चालकांची आवश्यकता आहे. तसेच, आता जे नवीन संगणक आले आहेत १६ त्याच्यामध्ये ते ७१ संगणक चालक कमी पडत असुन त्याच्यामध्ये आणखी १६ संगणक चालकाची वाढ करुन अंदाजे १० लाख रु. पेक्षा जास्त खर्च अपेक्षीत आहे. तरी या कामी सन २००६ ते २००७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका मध्ये (अ) सामान्य प्रशासन एक संगणक प्रशिक्षण या लेखा शिक्षकाखाली रु.५४,४१,१९६ तरतुद शिल्लक आहेत संगणक चालकांची आवश्यकता लक्षात घेता ठेका पध्दतीने घेणे व त्या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थीक प्रशासकीय मंजुरी देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**रविंद्र माळी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, या संबंधी आपण योग्य त्या निविदा वर्तमानपत्रात जाहीरात द्या आणि त्याच्या माध्यमातुन निविदा मागवा.

**दिपक खांबित :-**

जाहिर निविदा तुम्हाला द्यायला लागणार आहेत ना, तर जुन कॉन्ट्रक्ट संपायच्या अगोदर आधी नवीन कॉन्ट्रक्ट करायचे आहे.

**मा. सभापती :-**

मंजुर. सचिवांनी पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १५०:-**

संगणक चालक (ऑपरेटर) ठेका पद्धतीने घेणेकरिता नविन वार्षिक ठेका निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. १५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालयात, नागरी सुविधा केंद्र, प्रभाग कार्यालये तसेच विविध विभागामध्ये संगणकांमार्फत कार्यालयीन कामकाज केले जाते. सदर कामी ७१ संगणक चालक ठेका पद्धतीने घेतले असून सदर ठेक्याची मुदत दि. ३१/१२/२००६ व दि. ०७/०२/२००७ रोजी संपत आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागात १६ संगणक चालकांची आवश्यकता असल्याने एकूण ८७ संगणक चालक लागणार आहेत.

संगणक चालक ठेका पद्धतीने घेणे कामी वार्षिक खर्च अंदाजे १० लाखापेक्षा जास्त अपेक्षित आहे. याकामी सन २००६/०७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये अ १ सामान्य प्रशासन १ संगणक खरेदी/प्रशिक्षण

या लेखाशिर्षाखाली रू. ५४,४१,१९६/- तरतुद शिल्लक आहे. संगणक चालकांची आवश्यकता लक्षात घेता संगणक चालक जाहिरात देउन ठेका पद्धतीने मानधनावर करारनामा करून नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. नवीन आदेश देईपर्यंत जुन्या ठेकेदारांस मुदत वाढ देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. रविंद्र माळी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

( नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५१ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**
साहेब, आपण आता ह्या विषयाचा ठराव मांडलेला आहे.

**मा. सभापती :-**
बोला काय?

**ध्रुवकिशोर पाटील :-**
सचिवजी १५० वा विषय झालेला आहे. पुढील विषय सुरु करण्याच्या अगोदर मागे अशी चर्चा झाली होती की, सफाई कर्मचारी बाकीचे जे कामगार ठेका पध्दतीने आपल्या आस्थापनेवर मागवणार होते. आपण त्यांच्या सगळ्यांचे इन्टव्ह्यू सुध्दा घेतल्या आहेत व सेकंड टर्मच्या इंन्टव्ह्यू घेण्याच्या बाकी आहेत. तर साहेब, आपले मागे ठरल्या प्रमाणे ३ - ३ लोकांना आपण घेणार होतो. त्याची परिस्थिती काय आहे?

**मा. आयुक्त :-**
विषय पत्रिकेवरील विषय आपण पहिल्यांदा घ्यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**
ठिक आहे.

**एस. ए. खान :-**
१५१ मध्ये जे उड्डाण पुलाच्याखाली दिलेले आहे. कुठे आहे, ते एक्झॅक्ट लोकेशन कुठले आहे?

**दिपक खांबित :-**
ब्रिजच्या खाली आपण ब्रिज चढतो तिथेच.

**एस. ए. खान :-**
भाईंदर पुर्वेला

**ध्रुवकिशोर पाटील :-**
जे सर्विस रोड लेफ्ट साईडला इंडस्ट्रियल एरिया मध्ये आहे.

**एस. ए. खान :-**
आतमध्ये ना. तिथे जर झोपडपट्टी उभी राहिली तर ट्रफिकला अडचण होईल .

**जयंत पाटील :-**
मा. सभापती साहेब, ही मागणी कोणाची आहे?

**रोहिदास पाटील :-**
भाईंदर पुर्वेला अमुक - अमुक जागा आहे त्या मोकळ्या जागेत किती माणस मावतील.

**जयंत पाटील :-**
सन्मा. सदस्य ही मागणी कोणाची आहे. ते तरी कळूद्या कारण असे इतर ठिकाणी नाही. तुम्ही त्यांना जागा दिली मंजुर आहे. तरी ते इतर ठिकाणी ते उभे राहणार नाहीत का?

**एस. ए. खान :-**
राहणार ना.

**जयंत पाटील :-**
साहेब, तुमच्या ना फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीवाले बसतातच ना.

**एस. ए. खान :-**
एवढी सुविधा आहे. सुलभ शौचालये हे ते आहेत व डॉक्टर हे ते वैगरे.........

**जयंत पाटील :-**
ना फेरीवाले झोन मध्ये फेरीवाले बसतातच ना. गॅरेटी द्याल का ते इतर ठिकाणी बसणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही टेम्पो स्टॅण्ड हलवु शकत नाही. ५० - १०० टेम्पो स्टॅण्ड साठी आपण मागे किती भांडलो. टेम्पो स्टॅण्ड हलवा. आपण ५० टेम्पोवाल्यांना हलवु शकत नाही. तर हजारो ते मजदुर कामगार आहेत त्यांना तुम्ही कसे हलवणार? इमपॉसिबल आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

आप आझाद नगर के रोडपर देखो कितना मजदुर कामगार होते है।

**मा. सभापती :-**

टेम्पोवाल्यांना हलविण्याबाबत आयुक्त साहेबांनी व मी सुध्दा प्रयत्न केलेले आहे.

**एस. ए. खान :-**

एकदम कसे होईल? लोकांना कळल्यानंतर लोक तिथे जातील ना.

**मा. सभापती :-**

माझ्या आदेशानुसार १ महिना ते टॅम्पो तिथे राहीले आहेत. त्यांच्या एका फेरीचा ही काहीच धंदा झाला नाही. त्यांच्यानंतर मी त्यांना तिथे जागा हलवलेले आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

इसके लिऐ वह पुरा रोड जाम हो गया है।

**रतन पाटील :-**

दुरुस्तीचा माल ने आण करण्यासाठीच टॅम्पोची आवश्यकता आहे. ते काही कोणी डोक्यावर वस्तु उचलुन आणु शकत नाही. पण जिथे आपण महानगरपालिकाची त्यांना जागा दिलेली तेव्हा सगळा रस्ता चांगला मोकळा झाला होता.

**एस. ए. खान :-**

असे होउ शकत नाही. ज्यांना गरज आहे ते तिथे जाणारच ना.

**मा. सभापती :-**

पुलाच्या खाली ?

**एस. ए. खान :-**

होय.

**मा. सभापती :-**

तिथे प्रत्यक्ष मी १ महिन्यापर्यंत गाड्या ठेवल्या होत्या.

**शशिकांत भोईर :-**

तात्पुर्ती केबीन लावुन ऑफीसची व्यवस्था केली की, या नंबरने तो टॅम्पो ठेवावा.

**मा. सभापती :-**

ऑफीस तिथेच होत ते ऑफीस तिथे हलविलेले नव्हते तरी सुध्दा धंदा तिथे झालेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

रस्ता बनविलेला तो.

**मा. सभापती :-**

त्याला पर्यायी जागा काढा ना. रितसर पर्यायी जागा द्यांना चांगली त्यांचे त्यावर पोट आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

बरोबर आहे, होईल ना ते हळुहळू.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना पुलाखाली जागा दिली होती ना.

**मा. सभापती :-**

जागा दिली होती, पण तिथे धंदाच होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

मग, काय आपण रस्ता बंद करायचा का?

**हसुकूमार पांडे :-**

लेकिन जिसेको टॅम्पो की जरुरत है वो वहा लेने के लिए जाऐगा ही ना। वो आझाद नगर मे देखो. कितना रोड जाम किया हुआ है। सब तरफ गाडीया होती है। लोगोकी गाडीया वहा खडी रहती है। हम लोगोने इतना खर्चा करके रोड बनाया है पर अपनी गाडी जाने के लिऐ भी जगह नही मिलती । हटाव ना। अपने महानगरपालिका का काम है हटाने का। उठाके ले आईऐ और फाईन मार दिजीऐ।

**रतन पाटील :-**

ट्रान्सपोटेशन मोठया गाड्या उभ्या राहतात. अनधिकृत अशा पध्दतीने त्याच्यावर आपली कारवाही होत नाही. आपले जे टॅम्पो शिफ्टींग केले तर तिथे चांगले होईल ते तिथे व्यवस्थीत राहतील आणि जवळच्या-जवळ तिथुन ते लांब पण नाही टॅम्पो स्टॅण्ड जे उभे आहेत आता ते काही लांब नाही तिकडे करा.

**मा. सभापती :-**

तिथेच हलवलं होत टॅम्पो स्टॅण्ड तिथेच नेला होता.

**एस. ए. खान :-**

ज्यांना गरज लागेल ते जातील .

**रोहिदास पाटील :-**

ते भिमराच्या इस्टेडकडे हटविले होते ना.

**हंसुकूमार पांडे :-**

मग, काय झाले काय?

**रतन पाटील :-**

साहेब, त्यात बाहेरचे टॅम्पो केवढे आहेत.

**रोहिदास पाटील :-**

भाईंदर पुर्वेला एक दर्शनिय रोड . तो रोड कोण मोकळा करणार? आपण त्यांना धंदा करायला देत आहोत ना.

**रतन पाटील :-**

स्थानिक टॅम्पो किती आणि बाहेरुन टॅम्पो येणारे किती?

**हंसुकूमार पांडे :-**

जो इन्डस्ट्रीअल को जरुरत होगी वह लेके जाऐंगे।

**रोहिदास पाटील :-**

अब सबके पास मोबाईल है।

**एस.ए. खान :-**

साहेब, तो विषय चुकीचा आहे मी बोलतो. कुठेही नाही. पुर्ण इंडियाध्ये असे कुठे आहे? हा जी १५१ चा विषय आलेला आहे की, त्यांना शौचालय द्यायचे व डॉक्टर्सची तपासणी वगैरे तर एवढी सवलत कुठे आहे?

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही टॅम्पो पुला खाली घ्या. तो जो मेन रस्ता आहे तो तुम्ही मोकळा करायला पाहीजे.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भातमध्ये मी अशी सुचना केली की, मा. सभापती साहेबांचे असे म्हणणे आहे की, पर्टीकुलर एकाच ठिकाणी टॅम्पो स्टॅण्ड नाही. शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी टॅम्पो स्टॅण्ड आहेत. ते सगळे टॅम्पो जर आपण एकाच ठिकाणी आणले तर सगळयांचा धंदा होईल असे त्यांचे म्हणणे आहे तर मी अशी सुचना करतो की ज्या-ज्या ठिकाणी अशाप्रकारे टॅम्पो स्टॅण्ड आहेत. तिथे किती गाड्या उभ्या राहतात. त्याची सगळी माहीती आणतो. सगळी स्थायी समितीला सादर करतो आणि पुढच्या माहीती तयार करतो. तेव्हा चर्चा करुया.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, तो आपला मेन रस्ता आहे ना.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, नवघर रोडचा टॅम्पो स्टॅण्डवाला तिथे कशाला येईल?

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, तो आपला मेन रस्ता आहे ना.

**मा. आयुक्त :-**

आपण ठरवा ना काय करायच ते.

**हंसुकूमार पांडे :-**

पार्किंगला रस्ता हा आपण मेन रस्ता आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही सांगतो जे करायच ते आपण करतच नाही.

**मा. आयुक्त :-**

पर्टीकुलर एकाच रस्त्यावरचे काढायचे आहेत का?

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, तो एकच मेन रस्ता तोच आह ना. तुम्ही पुर्वेला जिथुन येता.

**रतन पाटील :-**

आपण जशा पध्दतीने आज फेरीवाल्यांनवर कार्यवाही केली तशापध्दतीने हा मुख्य रस्ता आहे. शहराची नाक आहे. त्यांना तेथुन हलवा असे म्हणत नाही तर त्याची दुसरीकडे अन्य ठिकाणी सोय करा. जशी आपल्याकडे जागा आहे ते बघा.

**मा.सभापती :-**

तुम्ही या प्रत्यक्ष आणि समजुन घ्या त्याचा अध्यक्ष मी आहे. मी एक महिना टॅम्पो ही त्या ठिकाणी हलवले होते. तुम्हाला विरोध करायचा असेल तर मी त्यांना सांगतो रस्त्यावर उतरायला तुम्ही काय करायच असेल तर करा.

**रतन पाटील :-**

आम्ही सांगतो त्यांची सोय करा त्यांना हुसकून टाका असे सांगत नाही. कुठेतरी शहराच्या दृष्टीने त्यांची सोय करा.

**मा. सभापती :-**

फेरीवाल्यांना उचलले तेव्हा मी साहेबांना त्रास दिला का ते विचारा? एकाने विष घेतले म्हणुन मी फक्त त्यांना रिक्वेस्ट केली की साहेब असे - असे चाललेल आहे आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. तुम्ही ही मोहीम थांबवा. माझ्या युनियन मध्ये बी. पी रोड मध्ये हे कधीपासुन चाललेले आहे तर श्री संपतराव शिंदे होते त्यावेळी पासुन चाललेल आहे. माझे लेटर वगैरे आहे. रितसर तुम्ही पर्याय जागा द्या. मी कुठेही त्यांना बसवतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, कालच्या सभेमध्ये चर्चा झाली तेव्हा हे सांगितले की, जे व्यापारी आपले आहेत. आपण कुठेतरी मार्केट बनवायला पाहीजे. आपण जर वेगवेगळया ठिकाणी मार्केट बनविले तर लोकांची सोय होईल आणि ते ही तिथे बसतील तुमचे म्हणणे तेच आहे.

**मा. सभापती :-**

मला मान्य आहे.

**जयंत पाटील :-**

म्हणजे रस्ता मोकळा होईल.

**मा. सभापती :-**

रस्ता मोकळा होईल हे बरोबर आहे पण, जो पर्यंत पर्यायी जागा देत नाहीत तो पर्यंत ते फेरीवाले कुठे जातील.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब , पर्यायी जगह देने का काम महानगरपालिका का है। हमने सुझाव दिया है। और उसपर पर्यायी जगह देने का काम तो महानगरपालिका का है ना।

**रोहिदास पाटील :-**

त्या रस्त्याने नीट चालु ही शकत नाही. दोन रस्ते होतील आणि यामध्ये महापालिकेचे अस्तित्व कुठे आले.

**मा. सभापती :-**

हे सर्व मला मान्य आहेत. त्यादिवशी मी प्रत्यक्ष पाहील की, ही मोहीम अशी चाललेली आहे. बि. पी. रोडवरच फक्त उचलत होते. पण नवघर रोडच ते उचलत नव्हते कुठल्याच ठिकाणचे उचलत नव्हते नया नगर, काशिमीरा तसच ठेवल आहे. जेव्हा मी श्री. अजित पाटील यांना आदेश दिले की, त्या टाईममध्ये मोहीमेला सुरुवात केली मग, तुम्ही एका बाजुलाच का करतात? त्या दिवशी नया नगरच का नाही उचलत ते मला सांगा?

**रतन पाटील :-**

आम्ही तेच बोलत आहोत.

**मा. सभापती :-**

श्री. अजित पाटील यांना मी सांगितले की, मला रिपोर्ट करा तर त्यांनी मला रिपोर्ट का केला नाही.

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदर महापलिकेच्या हद्दीतील जे नो - हॉकर्स झोन आहेत. तेथुन सगळे फेरीवाले उचला.

**मा. सभापती :-**

सर्वच ठिकाणचे उचलायला पाहिजे ना. १५ दिवस सतत उचलतात. बी. पी रोडच उचलले पण नवघर रोडच का नाही उचलतात ?

**हंसुकूमार पाटील :-**

साहेब, नवघर रोडचे उचलले आहे.

**मा. सभापती :-**

नंतर उचलले जेव्हा मी आदेश दिले तेव्हा उचलले मी प्रत्यक्ष त्या ठिकाणी नवघर रोडला फन्शनला गेला होतो तेथील फेरीवाल्यांना उचलले नव्हते.

**रोहिदास पाटील :-**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, दोन्ही ठिकाणचे उचलले गेले होते?

**मा. सभापती :-**

पण कधी? मी आदेश दिले आणि त्यानंतर त्यांनी नवघरच फेरीवाल्याला उचलले. तिथे ही माझा झोन आहे. मी सांगतो तुम्हाला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब , आज आपण निर्णय घेउ या की आपल्या महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या आणि अतिक्रमण विभागाच्य गाड्या संध्याकाळी खाली असतात. त्याचे आपण ५ झोन करुया .

एका भाईंदर वेस्ट, भाईंदर इस्ट, मिरारोड आणि हायवे आणि ती गाडी कम्प्लीटली सगळीकडे फिरत राहील व संध्याकाळी फेरीवाल्यांना उचलत राहील.

**एस. ए. खान :-**

नंतर गाडी नाही हे नाही असे होत राहील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

५ झोन करुया आणि ती गाडी फिरत राहील.

**मा. सभापती :-**

मेन जुने जे स्थानिक फेरीवाले आहेत त्यांचा रेकॉड बघा त्यांना तुम्ही लायसन्स द्या. गाडी वाले जे फिरतात त्यांनाही परवाना द्या. त्या हद्दीतुन या हद्दीतच एवढयाच हद्दीतच आपण धंदा करु शकता. अशी माझी विनंती आहे जर तुम्ही निर्देशनात आणत नाही तर मग, आम्ही कुठे जायचे? केले काय? मी केलेले आहे. तो माझा ठराव आहे तिथे माझे लेटर आहेत.

**हंसुकूमार पांडे :-**

हम लोग आपके लेटर के साथ मे ही है। हम लोगो का भी ऐसा ही ठराव है ना।

**मा. सभापती :-**

सन्मा सदस्य, बोलते है की, टेम्पो हटाव साहेब, तुम्ही सांगितले टेम्पो हलवा तेव्हा मी एक महिन्यापर्यंत हलवले. तेव्हा मी कुठल्या पदावर ही नव्हतो.

**हंसुकूमार पांडे :-**

जिस इंडस्ट्रीज को जरुरत होगी तो वो जाऐगा टॅम्पो लेने के लिए। जरुरत होगी तो वो जाऐगा।

**मा. सभापती :-**

मी साहेबांना नेहमीच सहकार्य केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

टेम्पोच्या बाबतीत ही तक्रारी येतात. आज काल .

**शशिकांत भोईर :-**

मोबाईलचे नंबर, त्यांचे नाव, नंबर ही द्यायचा. सर्व डिटेल द्यायचे बोर्डवर म्हणजे ज्याला पाहीजे असेल तो फोन करेल.

**मा. सभापती :-**

नामंजुर

**दिपक खांबित :-**

साहेब, त्यांना कुठेतरी जागा द्यायला पाहिजे ना.

**जयंत पाटील :-**

हा सरळ विषय आहे. हे शहर किती लांब लचक आहे हे आपल्याला माहीत आहे. एका ठिकाणी तुम्ही कामगार ठेवणार दुसऱ्या ठिकाणी जर उत्तनला त्यांना कामगार लागले तर ते का भाईंदरला येतील? घरामध्ये थोडे रिपेरींग करायचे आहे. बिगारी पाहीजेत तुम्ही पुलाखाली येणार आहेत? प्रत्येक ठिकाणी ते आपआपल्या सोयी प्रमाणे थांबलेले आहेत.

**दिपक खांबित :-**

साहेब, भाईंदर पुर्वेला त्यांना जागा कुठे आहे?

**मा. सभापती :-**

जशी आता गरज आहे. तशी ज्याला टॅम्पोची गरज आहे तर सर्वजण टॅम्पो कडे जाणार ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

ही छोटी गोष्ट आहे. टेम्पोवाले फोन करुनही येतात.

**मा. सभापती :-**

याच्या साठी ही तिथे माणसे जातील ना ते एकाच नाक्यावर राहु दे.

**जयंत पाटील :-**

तिथली माणसे तिथे उभी पण राहतील हे नाक्यावर थोडेच उभे राहणार आहेत. टेम्पोचा विषय वेगळा आणि हा विषय वेगळा आहे.

**मा. सभापती :-**

विषय तोच आहे मी ते समजुन देतो ते सिध्द करुन देत आहे.

**जयंत पाटील :-**

ते वाहन आहे. ही गोष्ट वेगळी आहे.

**मा. सभापती :-**

पण, ज्या माणसाला गरजंच तो मनुष्य कुठेतरी जाणारच ना.

**जयंत पाटील :-**

तुम्ही अतिक्रमण हटवा अगोदर तुमच गोडदेवच तलाव आहे.तिथे चारही बाजुला भैये बसले आहेत. आत मध्ये जाण्यासाठी इन्ट्री मिळत नाही. तुमच्या गावात जाण्यासाठी इन्ट्री मिळत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तलाव जवळील गार्डनच्या आजुबाजूला फेरीवाले आहेत त्यांना हटवुन टाका.

**जयंत पाटील :-**

ते हटले का? तर नाही हटत ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हटवणार ना.

**जयंत पाटील :-**

आम्हाला तुमच्या घरी यायचं झाल तर दुसरी कडुन यावे लागते ही परिस्थिती आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, प्रकरण क्र. १५१ याचा व्यवस्थीत कोण कुठे बसतात याचा गोषवारा द्या? तुम्ही हे असे अर्धवट आणु नका. प्रकरण क्र. १५१ साहेब यात कुठे काय बसतात.

**दिपक खांबित :-**

संपुर्ण केबीन रोडला ते बसतात.

**रतन पाटील :-**

संपुर्ण मिरा भाईंदर मध्ये बसतात. या गोषवाऱ्यात आहे का? साहेब, गोषवारा द्या. असे काही करु नका सगळीकडे आहेत. आहे का गोषवारा? इथे एवढे - एवढे बसतात. इथे तेवढे बसतात. तुम्ही पुर्ण गोषवारा घेउन या त्यांना सुविधा काय द्यायच्या आहेत त्यासाठी आम्ही सर्वजण सक्षम आहोत ना.

**दिपक खांबित :-**

उन्हामध्ये ते बसतात. त्यांना आपण सोई द्यायला पाहिजे ना.

**जयंत पाटील :-**

खांबित साहेब, तुम्हाला माहीत आहे का? तुम्ही जर त्यांना बोलवलत की काम करायला या तर काम काय आहे हे अगोदर विचारतात आणि तूम्ही जरी १२.०० वाजता नेलत तरी संपुर्ण दिवसाचा पगार घेतात.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना मी याबाबतीत विनंती करतो की, जर एखादा कामगार समझा जर, एखादे काम नाकारत असेल म्हणून आपण सबंध कामगारांसाठी निर्णय घेण किंवा वेगळ्या पद्धतीने निर्णय घ्यायला पाहीजे असेच आपण ठरवू शकत नाही शेवटी आपल्या शहराची जी गरज आहे. आणि आपल्या शहरामध्ये ज्या-ज्या ठिकाणी असे कामगार उभे राहतात आणि त्या कामगारांपासून तर रहदारीला त्रास होत असेल, नागरिकांना त्रास होत असेल तर त्याच्यासाठी जर समजा आपल्याकडे जागा उपलब्ध असेल तर त्यांना त्या ठिकाणी शिफ्ट का करु नये?

**गिता जैन :-**

साहेब, आपण त्यांना तिथे शिफ्ट केले आणि ते दुसऱ्या नाक्यावर उभे राहणार नाही याची गॅरेंटी आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपण त्यांना सांगु की, दुसऱ्या ठिकाणी उभे राहायचे नाही.

**रतन पाटील :-**

गॅरेंटी देणार कोण? त्यांची गॅरेंटी काय?

**जयंत पाटील :-**

त्यांना जिथे काम मिळत तिथेच ते उभे राहतात. पैसे मिळणार तिकडे उभे राहणार.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्या लोकांनी सर्वांनी मिळून आपल्याला हे पत्र दिलेल आहे

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पत्र कोणाचे आहे दाखवा.

**रतन पाटील :-**

पत्र दाखवा, त्याच्यावर सही किती आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

घरामध्ये भावंड एकत्र राहू शकत नाही. भावंड आपआपसात भांडतात प्रत्येक ठिकाणी दोन-दोन, तीन-तीन युनियन असते तर तुम्ही काय घेऊन बसलात. आता यांनी एकत्र पत्र दिल आणि उद्या यांचीच लोक दुसरी युनियन स्थापन करुन सांगितल की, आम्हाला तिकडे जायचे नाही आम्ही इथेच बसणार तर साहेब आपण काय करणार?

**दिपक खांबित :-**

आपण काय करणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही ना-फेरिवाला क्षेत्रामध्ये मज्जाव करु शकत नाही. तर तुम्ही येथे काय मज्जाव करणार?

**रतन पाटील :-**

आपण कुठे - कुठे बघणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्हाला शहराचे भले करायचे असेल तर करा. नसेल तर तसे सांगा की, आम्ही भले करत नाही. आम्ही ठराव मंजुर करतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

हा त्यांच्या भल्याचाच विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ते एक्सेप्ट होणार नाही.

**जयंत पाटील :-**

काय भले होणार आहे?

**तुळशीदास म्हात्रे :-**

तिथे ट्रॅफिक जाम होते हे तुम्हाला चालणार का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील तुमच काय मत आहे सगळ्यांच्या मताशी सहमत आहेत. तर जाउ द्या.

**रतन पाटील :-**

साहेब, मी प्रत्यक्षात सांगतो त्यांची व्यवस्था आपण मिरा भाईंदरमध्ये रावल नगरच्या कॉनरला केली आहे. तिथे पाण्याची टाकीसुद्धा बसवली पण ते तिथे आता आहेत का? ऐकाना साहेब, ती टाकीसुद्धा त्या लोकांनी फोडली. ते आता तिथे आहेत का? ते सर्व मिरा भाईंदर मध्ये आहेत. आपण त्यांना जागा दिली आहे. तिथे ओपन प्लॉट आहे ते तिथे का राहत नाही.

**दिपक खांबित :-**

ते डेव्हलपमेंटसाठी ठेवले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, डेव्हलपमेंट एका बाजूला आहे तिथे आहेत सगळे आता पाहून घ्या. पाहिजे तर आता आपले प्रतिनिधी पाठवून. अस का? ह्या जागेवर राहतील का ते? कोण देणार गॅरेंटी. साहेब, गॅरेंटी आपण देता का?

**जयंत पाटील :-**

प्रश्न दोन आहेत. ते पुन्हा येउुन त्याच ठिकाणी बसणार आहे. हे शंभर टक्के खरं आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, ते तिथे बसणारच आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पोलिस स्टेशनला सांगितले तर ते त्यांना तेथून उठवतील.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, पोलिस स्टेशनला कम्प्लेंट करुनसुद्धा पोलिसांनी त्यांना नेल त्यानंतर त्यांनी मोर्चा काढून पुन्हा तिकडेच बसले. सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी स्वतः पोलिस आणून त्यांना उुठवले होते. पण त्यांच्यावरच कंम्पलेंट झाली.

**तुळशीदास म्हात्रे :-**

श्री. शरद पाटील यांचीच तक्रार आहे. त्यांनीच सांगितले की नाही पाहिजे.

**रतन पाटील :-**

कुठे नको.

**शशिकांत भोईर :-**

फ्लाय ओव्हर जवळ.

**रतन पाटील :-**

मी तेच तर तुम्हाला बोलत होतो की, रावल नगर मध्ये त्यांची व्यवस्था केली तिथे ते बसतच नाही. अन्य सगळ्या ठिकाणी गोडदेव नाका, जेसल पार्क नाका, जागृती स्टेशनच्या बाजूला सगळीकडे नाक्यावर उभे आहेत. आपण रावल नगरमध्ये त्यांची व्यवस्था केली.

**दिपक खांबित :-**

साहेब, तिथे जागा नाही ना. सुलभ शौचालय म्हणून ती जागा दिलेली आहे. ती आरक्षित जागा.

**रतन पाटील :-**

ते राहतील याची गॅरेंटी कोणाला आहे. गॅरेंटेड कोण आहे. खात्रीने सांगा चला. कोण खात्री देत आहे. तुम्ही खात्री देता? संपुर्ण मिरा भाईंदर मध्ये ते कुठेही उभे राहणार नाहीत.

**जयंत पाटील :-**

आम्ही मंजुरी देतो. जो महानगरपालिका खर्च करणार आहे त्याची वसुली त्यांच्या कडून करायची.

**दिपक खांबित :-**

तिथे महानगरपालिका खर्च करणार नाही.

**रतन पाटील :-**

मग कोण दुकान चालवत आहे. हे दुकान कोणाच आहे.

**जयंत पाटील :-**

वाचा ना गोषवारा.

**दिपक खांबित :-**

खाजगी संस्थेमार्फत करणार आहे.

**जयंत पाटील :-**

असा काहीच उल्लेख नाही. गोषवारा वाचा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. खांबित साहेब पैशाची मंजुरी मागितलेली आहे.

**दिपक खांबित :-**

महानगरपालिकेला एक पैशाचाही खर्च होणार नाही.

**गिता जैन :-**

आज तक कौनसे म्युनिसीपालिटीने यह सब सुविधा यह कामगारोको दी है।

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये आदेश आला की आपण बघतो महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका ठाणे महानगरपालिका, असे आदेश बघतो तसे इथे आहे का?

**गिता जैन :-**

मिरा भाईंदर के नाम पे रेकॉर्ड सेट करना है। तो सुलभ शौचालय में वहाँपर भी ए. सी. वगैरा बिठाकर रेकॉर्ड सेट करते है।

**रतन पाटील :-**

साहेब, आम्ही तुमच्या मताशी शंभर टक्के सहमत आहोत. गॅरेंटी कोण घेणार की, ते दुसरीकडे बसणार. चांगला विषय असेल तर चांगलेच बोलतो पण गॅरेंटी कोण देतो? कोणाची गॅरेंटी घेत नाही. प्रशासन गॅरेंटी घेत आहे का? तर तसे सांगावे की प्रशासन गॅरेंटी घेते.

**जयंत पाटील :-**

हा विषय काढला कोणी?

**ज्युडी डिसोजा :-**

हा विषय काढला कोणी?

**दिपक खांबित :-**

संघटना आहे त्यांनी पत्र दिलेले आहे

**जेन्वी अल्मेडा :-**

शहरामध्ये बाकीची बरीच विकास कामांची गरज आहे आणि व्हायची आहेत. आणि हे फाजील लाड कशाला पाहिजेत.

**ग्रिटा फॅरो :-**

त्यांनी स्वतःहून कुठेतरी पर्यायी जागा शोधायला हवी.

**रतन पाटील :-**

व्यवस्थित गोषवारा आणून हा विषय पुन्हा आणावा. मा. सभापती साहेब, हा विषय नामंजूर करावा आणि व्यवस्थित गोषवारा आणावा.

**मा. सभापती :-**

सविस्तर प्रस्तावासह सदरचा विषय पुढे घेण्यात यावा. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १५१ :-**

नाका कामगार मजदुर यांना मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत जागा उपलब्ध करून देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

(सदरचा विषय मा. सभापती साहेबांच्या परवानगीने पुढील सभेत घेण्याचे ठरले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५२ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण ५० दशलक्ष पाणी पुरवठा योजनेची पर्यायी अर्धवट राहीलेली कामेपुर्ण करण्यासाठी ८ कोटी रुपयांची जी तरतुद केली होती. शहरामध्ये पाण्याची जी समस्या भेडसावत आहे. आपल्याकडे सम्पस् नाही आहेत. पंप नाही आहेत ही काम अर्धवट राहिलेली आहेत. साहेब, आपल्याला दोन्ही गोष्टी पूर्ण करायच्या आहेत, त्याच्यासाठी आपण ८ कोटी रुपयाची तरतुद केली होती. ती तरतुद समजा,

आजा आपण दुसरीकडे वळवत आहोत. ही कामे पूर्ण करायची नाही आहेत का? ती कामे कधी पूर्ण होतील? जसं सुभाषचंद्र बोस मैदानाच्या बाजूला आपल्याकडे जी टाकी आहेत, त्याच्या सम्पचं काम अर्धवट आहे. गोडदेवची टाकी बनवायची आहे. सुदामनगरची, कमला पार्कींग ह्या सगळ्या टाक्या व सम्प अर्धवट स्थितीत, त्याची स्थिती काय आहे? आणि ते पैसे पूर्ण कुठे खर्च झाले याची पूर्ण माहिती द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या साहेबांच्या परवानगीने बोलत आहे. आपणांस ५० दशलक्ष लिटरमधील वाढीव कामे करण्यासाठी सन २००६-०७ मध्ये ८ कोटी रुपयाची तरतुद करण्यात आलेली आहे. या महासभेच्या ठरावानंतर एम.एम.आर.डी. ने लोन न दिल्यामुळे महानगरपालिका पैसा उपलब्ध करुन देईल. त्यानुसार एम.जी.पी. ने काम करायचा असा ठराव पारित झाला. त्यानुसार मा. आयुक्तांनी पत्र दिलं आणि त्यानुसार त्यांनी त्यांच्या हालचाली चालू केल्या. प्रत्यक्षात काही भागामध्ये कामे चालू झालेली आहे. साहेबांकडे मिटींग झाली. ठेकेदारांची, एक्झीक्युटर यांची मिटींग झाली आणि साहेबांची चीफ इंजिनियर यांच्या बरोबरही आमची दोन वेळा मिटींग झाली. परंतु, पाहिजे तशी कामाला अजून गती मिळाली नाही आणि मार्चपर्यंत एवढा खर्च होणार नाही. एम.एम.आर.डी. पैसे देत नाही. म्हणून महानगरपालिकेच्या निधीतून पैसे द्यायचे ठरविलेले आहे. त्यानुसार आपण मार्चपर्यंत ८ कोटी रुपये खर्च होणार नाही. कारण ती सिव्हीलची कामे आहेत. ती एवढी फास्ट होत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, खर्च होणार नाही. सिव्हीलची कामे आहेत. या शहराला पाण्याची जी गरज आहे. त्याच्यासाठी हे सम्प आहेत. पाच मिनिट तरी पावर गेली तर आपल्या मिरा भाईंदरमध्ये एक थेंबही पाणी असत का? ही पहिले व्यवस्था बघायला पाहिजे. ह्याच्यामागे कोणी लागायला पाहिजे. हे सम्प कोणी तयार करायला पाहिजेत. आपण पाणी विभागाचे अधिकारी आहात. ही आपली जबाबदारी आहे. तसेच, आपल्या प्रशासनाची तसेच आपली आहे की नाही? त्याच्याबरोबर आम्ही पण नगरसेवक म्हणून आहोत. हे नको का करायला. ८ कोटी रुपये मा. महासभेने मंजुरी दिली आणि वर्षभरात ८ कोटी रुपये तुमच्याकडून काहीच कामे नाही का? त्याचा पाठपुरावा नको का करायला आणि आता जी आहे त्याचे पुर्ननियोजन करत आहात.

**शिवाजी बारकुंड :-**

तुम्हाला पाठपुराव्याबाबत सांगतो. मा. आयुक्तांच्या केबिनमध्ये ५ ते ७ वेळा बैठक झाली होती. एम.जी.पी. चे चीफ इंजिनियरकडे किमान ५ ते ७ वेळा बैठक झाली होती. ह्याच कामाबाबत साहेब स्वतः आले होते. ती कामे करा. तुम्ही कामे लवकर करा. ते बील आमच्याकडे द्या. दोन दिवसात पैसे देऊ पैशासाठी मिरा भाईंदर महानगरपालिके कडून कुठेही अडचण नाही.. लेखी पत्र दिले आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी तुम्हाला विनंती करतो की, आपण एम.जी.पी. च्या अधिकाऱ्यांना आणि ठेकेदाराची मिटींग घ्या आणि नंतर याच्यावर निर्णय घ्या. आपल्याला द्यायची काही हरकत नाही. साहेब, हा शहराच्या दृष्टीने मोठा प्रश्न आहे. मी विरोध करतो असे नाही आपण आपल्या मार्गदर्शनाखाली या सभेत आठ दिवसात करा. साहेब, हा शहराच्या दृष्टीने मोठा प्रश्न आहे.

**मा. सभापती :-**

याबाबत आपण लवकरात लवकर मिटींग लावून घ्या. त्यांची अपॉईंटमेन्ट घ्या.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक रतन पाटील त्याच्याप्रमाणे जावू द्या. परंतु, वितरण व्यवस्थेसाठी आमची कुठल्याही प्रकारची अडचण नाही. आम्ही ह्याला मंजुर आहोत.

**रोहिदास पाटील :-**

मला पाच मिनिटं सविस्तर बोलू द्या. आपण ही कधीकधी फार जोरात बोलतो. त्याच्यामुळे खरा विषय कुठे जातो आणि गरज कुठे? पाण्यापासून लोक तडफडतात ही खरी गोष्ट आहे. आपण कोणावर तरी आरोप करत आहोत. मग ते सभागृह हे असू दे की, ते असू दे. सम्प सम्प आपण म्हणतो. सम्पचे गणित कसे कोणाच्या लक्षात येत नाही. ते मला समजत नाही. माझ्या डोक्यात जवेढं आहे तेवढं मी सांगायचा प्रयत्न करीत आहे. या शहरात पाणी असं येत आणि असं जातं. साठवणूकीचा एक सेकंद सुध्दा प्रश्न येत नाही आणि आपण कोट्यावधी रुपये सम्प सम्प आणि पंप, आपले मा. आयुक्त त्याला होय म्हणतात. आपली सभा होय म्हणतेय आणि स्टेमवाले आणि एम.जी.पी हे दोन्ही पैसे उचलून नेतात. कशासाठी? आज कोणीतरी शास्त्रशुध्द तज्ञ असेल त्याने लेखी द्यावं की, आज येणाऱ्या पाणी पुरवठ्याला सम्पची गरज आहे का? एक सेकंद ही तुम्ही पाणी एक लिटर साठवू शकत नाही. येणारं पाणी असं येतं आणि अस जर सम्पमध्ये जे स्टॉकला जे पाणी लागत ते ठेवायची तरी तुमच्याकडे क्षमता आहे का? म्हणजे तशी तरतुद आहे का? शुन्य तरतुद आहे. येणारं पाणी पुरत नाही आणि येणारं पाणी कित्येक दिवस पुरणार नाही. तरीही आपण सम्प सम्प आणि पंप याच्यामध्ये उगाचच जोडण्या, उगाच सम्प आणि पंप याच्यामध्ये आपले करोडो रुपये त्या लोकांनी घेतलेले आहेत. हे माझं मत आहे. हे शास्त्रशुध्द मत आहे. साहेब, यात काहीही नाही. तुम्ही कुठूनही घेतलत तरी तुम्हाला एम.जी.पी.च सांगेल. ही ह्याची गरज आहे. अन्यथा दुसरी कोणतीही कन्सलटन्सी सांगणार नाही. आजच्या घटकेला सम्पची गरज आहे. ज्यादिवशी दुसरी १०० एम.एल.डी. पाणी येईल. सम्प काय आहे? सम्प

येथे जेथे तुम्ही पाण्याचा साठा करणार आणि पंपने वर चढवणार. आता इ.एस.आर. ने पाणी पोहचत आहे. सगळी इ.एस.आर. ला आपणही येथे आहोत आणि श्री. बारकुंड साहेबही येथे आहेत. प्रेशर डाऊन आहे असं ते म्हणतात. तुम्ही सगळे आऊटलेट ओपन करता. मा. आयुक्त साहेब, मला माहित आहे म्हणून मी तुम्हाला सांगतो. ३५ वर्षे मी ॲडवोकेटच काम करतो आहे. पण माझ्याजवळ सर्टीफिकेट नाही. येऊ द्या रेकॉर्डवर, आम्ही इथे काम करतोय. हे ज्यावेळी तुम्हाला पातलीपाड्यावरुन पाणी येतेवेळी सगळी वॉल तुम्ही ओपन केले. तुम्हाला २.८ प्रेशर मिळेल कसं? नवीन टाकी नया नगर चालू, एम.आय.डी.सी. चालू, गोडदेव चालू, मोर्वोची टाकी चालू सगळ्या सम्पचे आणि टाक्यांचे वॉल्व्ह तुम्ही ओपन ठेवले, तर ह्या पाईपलाईनवर प्रेशर डेव्हलप होईल का? होणार नाही. आहे ते तुम्ही टोटल करा. तेच पाणी, आता तुम्हाला विनंती केलेली आहे, सभागृहात विनंती केली होती. आपण सभागृहात आरोप करतो. सन्मा. सदस्य पाटील साहेब ऐकून घ्या. आपलं पाणी चोरीला जात आहे. शिवाय एक मिटर आतमध्ये आपलं मीटर आहे. आपण त्याच्यासाठी परत मागणी केली होती. जर त्याचं स्टेमच मीटर काही डाऊटफुल असेल, आपल्या ताकदीच स्वतंत्र बसवा. ते मीटर आपलं लागत नाही. सहा महिने झाले आता लागेल, आता लागेल. सहा महिने हा पाठपूरावा चालू आहे. अजून ते आपलं मीटर लागत नाही. उगाचच वायफळ कोणावर आरोप करण्यापेक्षा आपलं खरं कुठे काय? आपली व्यवस्था कुठे होईल? त्यासाठी सर्व सन्मा. नगरसेवकांनी, सर्व सन्मा. अधिकाऱ्यांनी त्याचं चिंतन केलं असलच तरच मा. आयुक्त साहेब आपण नीट पाणी कोणाला वाटू शकतो. खरोखरच पाणी नीट जात आहे की, नाही. नाहीतर मी आरोप करतोय आणि म्हात्रे साहेबही आरोप करतात. गोडदेवला पाणी भरपूर मिळतेय मात्र तुम्ही आरोप करता. सन्मा. नगरसचिव हरेश पाटील तुमचं नाव नाही घेत. उदाहरण सांगतो, थोडं इकडे पाणी जास्त येतं. तेथून दुसऱ्या ठिकाणी पाणी जास्त जातं. कोण म्हणत सकाळच पाणी जास्त येंतं ते दुपारपर्यंत असतं. दुपारच पाणी रात्रीपर्यंत असतं. असे साहेब कुठेही नाही. बोलायला सोपं आहे. पण आपण अधिकाऱ्यांवर आरोप करतो. तिकडे पाणी भरपूर आहे. पाणी येणारं ८१,८२,८५ एम.एल.डी. पाणी जे रोज येते. तेच आपल्याला वाटायच आहे. ज्या ज्या ठिकाणी तुम्ही साहेब आता ह्यांनी एवढ्या लाईनी मागितलेल्या आहेत. तुम्ही सन्मा. पाटील साहेब लक्षात घ्या. हे किती रुपयाचे आहे. इथे कोटीचा हा प्रश्न नाही. एवढ्या लाईन ज्या दिवशी तुम्ही चार्ज कराल ह्याच बाटलीतल पाणी सगळ्या ठिकाणी जाणार आहे. येणारी बाटली ही ८६ एम.एल.डी. पाणी एवढचं. आज जो आपको मिलता है, मुझे यदी पानी दिया तो आपमेसे कुछ परसेंटेज पानी कम हो जाएगा। यदी इनको दिया सन्मा. सदस्य स्टीवन साहब को पानी दिया तो मेरेसे कुछ परसेंटेज पानी कम हो जाएगा। असचं पाणी संपतय. जोपर्यंत ३०-३५ एम.एल.डी. पाणी नवीन येत नाही, ते जरी आलं तरी साहेब आज तुम्ही सम्पमध्ये साठवण्याची कुठेही तुमची क्षमताच नाही, आवश्यकता पण नाही. हे माझे निवेदन आहे. म्हणून मी तुम्हाला सांगितलं पाच मिनिटं माझं ऐका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यावर प्रशासनाने खुलासा करावा. प्रशासनाने सन्मा. सदस्य जे बोलले आहे, त्यावर खुलासा करावा की, ते चंकीचं आहे की बरोबर आहे.

**मा. सभापती :-**

खुलासा करीत आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो आहे. पहिला मुद्दा सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) यांनी काढलेला आहे की, सम्प आणि पंपची आवश्यकता ही स्कीम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणानी महानगरपालिका असताना मंजुर झालेली. मा. महासभेने त्याला मान्यता दिलेली. एम.जी.पी. इम्प्लीमेन्टेशन करतेय आणि त्याची जी अर्धवट राहिलेली काम आहेत. हे काही आजचं डिझाइन नाही की, आज इथे टाकी पाहिजे किंवा असं हे पाहिजे. त्याच स्कीममध्ये अर्धवट राहिलेली कामं एम.एम.आर.डी.ए. पैसे देत नाही. ते पैसे फक्त महानगरपालिका उपलब्ध करुन देईल. हाच विषय आहे कारण हे डिझाइन आजचं नाही आणि केलं आहे. एम.जी.पी ने आणि त्याला सभागृहाने, मा. महापालिकेने ह्या अगोदरच मान्यता दिलेली आहे. त्याच्यामधला हा मुळ मुद्दा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर तुम्ही म्हणता तर माझ्याकडे एम.जी.पी. ची ही डिजाईन आहे. हे एम.जी.पी. ने दिलेली आहे. आता सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब बोलले ते बरोबर आहे. मग आपण एवढ्या करोडो रुपयाचा खर्च का करत आहोत? आता आपण ते सम्प आणि पैसे आणत आहोत. ते खर्च करण्याची काय गरज आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

ती ५० एम.एल.डी. ची स्कीम, ११० कोटी रुपयाची स्कीम आहे. एम.एम.आर.डी.ए. ने नोंद दिलं नाही. त्यामुळे अर्धवट राहिलेली कामे आहेत. ती प्रलंबित कामं पूर्ण करावी. नागरिकांना त्या स्कीमचा पूर्ण फायदा व्हावा. म्हणून महानगरपालिकेने मा. महासभेत ठराव करुन महापालिका पैसे देईल असे मान्य झालेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर ते सम्प चालू होणार नसेल तर तिथे एवढा खर्च करुन मतलब काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, उपयोग होणार नाही असे आपण कसे काय म्हणू शकता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही सांगा ना. हा सम्प पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जर पुढचा विचार केला तर सम्पची या शहराला फार गरज आहे. उद्या पाणी आल्यानंतर आपण जर साठा केला नाही व कधीतरी आपले लाईन बंद झाली तर शहराला तुम्ही पाणी कुठून पुरवणार? म्हणून सम्पची गरज आहे. सम्पची गरज नाही असे बोलूच नका. पुढचा दृष्टीकोन लक्षात ठेवून कामे करा. एम.जी.पी. च्या लोकांनी जो आयुष्यभर अभ्यास केलेला आहे. डिग्री घेऊन आलेत. ते काही वेडे नाहीत. पुढची धोरण राखून जर पाणी आणला तर तो त्याच्याच मार्फत आलेला आहे. फक्त एवढच सांगातो की, उशीर झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

जिथे चुक झाली आहे ती समजून घ्या. त्यांनी केलेली स्कीम अमुक लोकसंख्येसाठी होती. त्याच्या २५ पट ४० पट आपली लोकसंख्या वाढत आहे. जोपर्यंत ही वाढती लोकसंख्या राहणार आहे. तोपर्यंत सम्पमध्ये पाणी येणार नाही. सम्पमध्ये जर पाणी ठेवायचे असेल तर तिथे अमूक एक संख्या अमुक लिटर पाणी आले पाहिजे जर ती उपयोगी पडणार आहे. नाहीतर त्यांची स्कीम चुकीची आहे. असे नाही ज्यावेळी त्यांनी स्कीम केली. त्यावेळी शहराची .............

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) आज आपल्याला प्रेशरने पाणी मिळत नाही. त्याचे मुख्य कारण सांगा ना.

**रोहिदास पाटील :-**

कुठे प्रेशरने पाणी मिळत नाही?

**रतन पाटील :-**

येणार पाणी वरच्या टाकीत चढत नाही. का चढत नाही? म्हणजे त्यांनी केलेली स्कीम ही चुकीची आहे का? अर्धवट राहिलेली कामे पुरी करायला नको का? आज आपल्या शहराची परिस्थिती काय आहे. पाच मिनिटे पावर गेल्यावर दोन-तीन दिवस आम्हाला पाणी मिळत नाही. ही परिस्थिती आहे. सम्प असेल तर एक टँकर किंवा बालटी घेऊन जाऊ शकतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब तुमची परवानगी असेल तर मी या विषयावर बोलत आहे. गोषवाऱ्यात पहिल्यांदाच दिलेले आहे की ५० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा योजना पूर्ण करणे, अर्धवट राहिलेली कामे ही जी ५० एम.एल.डी पाण्याची स्किम होती तेव्हा ती कामे याच्यात नमुद नव्हती. अर्धवट सोडली होती. ज्या ठेकेदाराने ती कामे घेतली होती त्याला काम करण्याचं गरजेचं नव्हतं का? ती अर्धवट कामे आपण का पुर्ण करावीत. बरोबर आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काकांनी) ही आता निवेदन केले आहे की, आपल्याला सम्पची गरज नाही. सम्पची गरज ही नितांत आहे. काही टाक्या अगदी उंचावर आहेत. जे तिथून ग्रॅव्हिटीने पाणी सोडलं जातं ते डायरेक्ट पाण्याच्या टाकीत जात. त्यामुळे ते प्रेशर लो होत ज्या प्रवाहाने त्या परिसराच्या टाकीत नळाद्वारे जाते तर त्यांना कमी प्रेशरने आणि जास्त वेळाने पाणी मिळतं म्हणजे १ तासाने मिळायला पाहिजे ते ४ तासाने त्यांना पाणी मिळतं त्यामुळे सम्पची अत्यंत गरज आहे तर तुम्ही सम्पच्या मागे लागा आणि आपण आता असे बोलत असाल. सम्पची गरज नाही फ्युचर मध्ये, समजा श्री. मुझफ्फर साहेबांनी ४० एम.एल.डी. पाणी मंजूर करुन आणलं आहे ते पाणी अतिरिक्त पाणी आपण कुठे ठेवणार तेव्हा विचार करणार की सम्प बांधणे गरजेचे आहे. आपल्याकडे पाणी येऊ दया किंवा नको येऊ दया.

**मा. सभापती :-**

३५ एम.एल.डी पाणी कुठे ठेवणार?

**शशिकांत भोईर :-**

जर सम्प बनविले तर त्यामध्ये आपण डायरेक्ट पाणी ठेऊ. ते नंतर पंम्पींग करुन वर चढवून लोकांना प्रेशरने पाणी देऊ शकतो. आणि पाणी लवकर मिळेल. आपल्याला लिफ्ट ने चढताना २ मिनिटामध्ये चढतो कारण त्यास इलेक्ट्रिसिटी दिलेली आहे. आणि आपण जर पायऱ्या चढलो तर आपल्याला आणखी वेळ लागेल. आपलं हे जे पाणी आहे ते पायऱ्या चढत जातं. डायरेक्ट इलेक्ट्रिकच्या सप्लाय ने जात नाही. त्यामुळे हे सम्प अत्यंत गरजेचं आह संम्प लवकरात लवकर लावावेत. आणि गोडदेवचा सम्प लवकरात लवकर चालू करावा. तो अजून पर्यंत त्यांनी तो सम्प सुरू केलेला नाही. मी मा. आयुक्तांना विनंती करेल की, आपण एम.जी.पी. च्या अधिकारी, इंजिनियर यांना बोलवा आणि संबंधित ठेकेदारांना बोलवा आणि त्याचे काम तातडीने सुरू करा.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो ही कामे महानगरपालिका करीत नाही. एम.जी.पी च काम करीते. साहेबांनी आता विचारलं मी साहेबांच्या प्रश्नाला उत्तर दिलं एम.जी.पी चं कामे करते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब मा. आयुक्त साहेब, आता श्री. बारकुंड साहेब बोलले की, ही कामे एम.जी.पी करते. आता मा. महासभेमध्ये रेल्वेच्या सबवे बाबत. आणि रेल्वेचे सर्व विषय झाल्यानंतर आपली कमिटी नेमल्यानंतर ती कमिटी डी.आर.एम ला भेटलो आणि इमिजेटली ॲक्शन घेतली. मागे तुम्ही सांगितले जी.एम सुद्धा येऊन गेले. ॲडिशनल जी.एम. ही येऊन गेले. तर आपली रेल्वेची मशिनरी एवढी फास्ट झाली तर आपली जी एम.जी.पी योजना आहे. स्टेमची अधिकारी जर तुम्ही बोलविले आणि जर कमिटी नेमली तर आम्ही ४ लोक हंटर घेऊन त्यांच्या मागे लागून काम करुन घेतो. तुम्ही ही जबाबदारी आमच्यावर सोपवा. ''बिनपगारी फूल अधिकारी'' साहेब, आमची ही सुचना आहे ती तुम्ही विचारात घ्या. आणि तसंच स्टेमच्या एम.जी.पी ची बैठक घ्या. आपण एक कम्बाईंड मिटींग घेऊ. बरोबर की नाही आणि तुम्ही खुलासा करावा की ३५ एम.एल.डी, ४० एम.एल.डी पाणी आलेलं आहे. त्याची तुम्ही ॲक्च्युअल परिस्थिती काय आहे. कारण बरेचसे लोक बोलतात श्री. मुझफ्फर साहेबांनी आणलं आहे. आमचे मा. महापौर मा. स्टिवन मेंन्डोसा साहेब सगळे मा. श्री. आर.आर.पाटील साहेबांना भेटले होते. पेपरमध्ये छापून फोटो आला होता. मा. श्री. आर.आर.पाटील साहेब यांनी डिक्लेर केलं होतं. की ३५ एम.एल.डी पाणी या शहरात मी एम.आय.डी.सी च्या पाईप लाईनमधून देतो. तर साहेब हे ॲक्च्युली गोडबंगाल काय आहे?

**रतन पाटील :-**

आमच्या आमदारांनी सुद्धा सांगितले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही खुलासा करावा.

**हंसुकुमार पांडे :-**

श्री. बारकुंड साहेब, तुम्ही पण तिकडे होता ना.

**मा. सभापती :-**

श्री. बारकुंड साहेब, मंत्रालयातही होते. मा. आयुक्त साहेबही होते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी प्रकरण क्र. १५२ पुर्नविनियोजन करण्याबाबत जो विषय सभागृहासमोर चर्चेला आला आहे. या संदर्भामध्ये जो विषय आहे तो रिॲप्रोप्रीएशनचा विषय आहे. एका हेडमधून पैसे काढून ते दुसऱ्या हेडमध्ये वर्ग करायचे आहेत. हे वर्ग करत असताना या हेडमध्ये जो काही खर्च अपेक्षित आहे. तो खर्च जो दोन-तीन महिन्याचा कालावधी शिल्लक राहिलेला आहे. त्या तीन महिन्यामध्ये संपूर्ण खर्च होणार नाही. परंतु, तो खर्च त्याच हेडमध्ये काढून दुसऱ्या हेडमध्ये टाकायचा आहे आणि ज्याठिकाणी त्याची नितांत गरज आहे. आपण ही जी चर्चा केली आहे की, ५० एम.एल.डी. पाणी आपण शहरासाठी उपलब्ध करुन दिलें आहे. त्यासाठी ११० कोटी रु. योजना जी तयार केली होती. त्यासाठी एम.एम.आर.डी. कडून ते पैसे एम.जी.पी. कडे वर्ग झाले होते. त्याच्यामध्ये कर्जाची रक्कम जशी वर्ग झाली तशीच त्या योजनेसाठी मिळालेल्या अनुदानाची रक्कमही वर्ग झालेली आहे आणि त्या योजने अंतर्गत जी कामे अजुनही पूर्ण झाली नाहीत त्याच्यासाठी आपण तरतुद करुन ठेवली होती. मध्यंतरीच्या काळात जस कार्यकारी अभियंत्यांनी आपल्याला सांगितलं की, या बाबतीमध्ये सक्षम अधिकाऱ्यांशी चर्चा झाली होती आणि वेळोवेळी चर्चा झाली आहे आणि कुठेतरी ते काम मार्गी लागलेले आहे. जी कामे ११० एम.एल.डी. ची ११० कोटी रुपयांच्या योजनेतील कामे आहेत. जी ती अपूर्ण आहेत. तीच पूर्ण करायची आहे. उदाहरण द्यायचं झालं तर जास्त त्रास जो आपल्याला होता तो सुभाषचंद्र मैदानाजवळ जी पाण्याची टाकी आहे तीचे बांधकाम जे चालु आहे. ती पाण्याची टाकी पूर्ण झाल्याशिवाय पुढचा जो परिसर आहे त्या परिसराला पाणी मिळणार नाही याची आपल्याला जाणीव आहे आणि लोकांच्या अडीअडचणी दुर करण्यासाठी महानगरपालिका नेहमीच प्रयत्नशील असते. ही जी अपूर्ण राहिलेली कामे आहेत त्यांना चालना देण्याचं काम आपण सुरु केल ं आहे. मा. महासभेने निर्णय घेतला आहे की, जे काही १० ते ११ कोटी रुपये एम.जी.पी. कडून कर्ज घेण्याच शिल्लक राहिलेलं आहे. तेव्हा त्यांच्या कर्जाच्या व्याजाचा जो दर होता तो जास्त होता. म्हणून मा. महासभेने त्यावर निर्णय घेतला की, त्यांच्याकडून कर्ज उपलब्ध करुन आपण घेणार नाहीत. महानगरपालिकेमध्ये जर स्वतंत्र निधी असेल तर त्यातुनच ही उर्वरित कामे पूर्ण करावीत अशा प्रकारचा आपला निर्णय झाल्यानंतर सक्षम अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि त्या बैठकीमध्ये काम आपण मार्गी लावलेले आहे. ह्याच्या अगेंस्ट माझ्या माहितीप्रमाणे कमीत कमी ४०-४५ लाख रु. आपण त्यांच्याकडे जमाही केले आहेत. त्याच्यासाठी जी मशिनरी आली आहे. ही मशिनरी बऱ्याच दिवसापासून ह्या ठिकाणी आणलेली आहे. ते टेस्टींग करण्याच काम चालु आहे. जर समजा त्या टेस्टींगचा रिपोर्ट ओके आला तरच ते आपण लावणार आहेत. नाहीतर ते आपण पुन्हा देणार आहोत आणि त्या ठिकाणी आपण नवीन मशिनरी लावणार आहोत. विषय फक्त आहे. पाणी पुरवठ्याच्या संदर्भातला जो एक रिॲप्रोप्रिएशन विषय आहे समोर ठेवण्यात आलेला आहे. एक बजेट मधील तरतुद काढून ती दुसऱ्या ठिकाणी वर्ग करायची आहे. ज्या ठिकाणी खर्चाची रक्कम ही आपल्या या अंदाजपत्रिकेवर रक्कम जी दर्शविली आहे ती खर्च होईल.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १५२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सर्वानुमते ठराव मंजुर.

**प्रकरण क्र. १५२ :-**

पुर्नविनियोजन करणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १५५ :-**

**अ क्र. १**

"५० द.ल.लि पाणीपुरवठा योजना पुर्ण करणे (अर्धवट राहिलेली कामे)" yaa laoKaiSaYaa-KalaI sana २००६–०७ yaa vaYaa-cyaa Aqa-saMklpat $.८००.०० लक्ष evaZI trtUd krNyaat AalaolaI Aaho.sadr trtUdI AMtga-t Aajaपर्यंत रू. १०.०० लक्ष इतकी रक्कम खर्च झालेली आहे. naijakcyaa kaLat sadr laoKaiSaYaa- AMtga-t मोठा Kca- haoNyaacaI Sa@yata farच kmaI Aaho.mahanagarpailaका क्षेत्रात Anaok izkaNaI mau#ya jalavaaihnaI AMqarNaocao kama hatI घ्यावयाचे Aaho. yaa vyaitir@t kahI izkaNacyaa jalavaaihnyaa vaarMvaar gaLtIbaabat tËarI yaot AsaUna %yaa badlaNao AavaSyak Aaho. tsaoca kmaI dabaanao paNaI purvaza haoNaa–yaa jalavaaihnyaa Coduna yaaogya p`karo paNaI ivatrNaa krIta jalavaaihnaI TakNao AavaSyak Aaho. या करीता सदर कामाची प्राकलने तयार करण्यात आलेली असुन नविन जलवाहिनी टाकणे या लेखाशिर्षाअतंर्गत उपरोक्त कामाकरीता येणा-या खर्चाची तरतुद करण्यात आलेली आहे सदर तरतुद अपुरी पडत आहे या करीता "५० द.ल.लि पाणीपुरवठा योजना पुर्ण करणे (अर्धवट राहिलेली कामे)" yaa laoKaiSaYaa-KalaIla $.२००.०० laxa [tkI r@kma naivana jalavaaihnaI TakNao yaa laoKaiSaYaa-KalaI vaga- krNaosa मा. स्थायी समिती सभेस शिफारस करणेत येत आहे.

**<u>A.Ë.२</u>**

"वितरण व्यवस्था व किरकोळ खरेदी / दुरुस्ती" yaa laoKaiSaYaa-KalaI sana २००६–०७ yaa vaYaa-cyaa Aqa-saMklpat $.३००.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आली असुन सदर trtUdIतुन आजपावेतो रु. १,३०,४७,७८०/- इतकी रक्कम खर्च झाली असुन रु १,६९,५२,२२०/-- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर लेखाशिर्षा अतर्गत शिल्लक तरतुदीतील संपुर्ण रक्कम Kca- haoNyaacaI Sa@yata far kmaI Aaho. mahanagarpailakocyaa paNaI purvaza ivaBaagaaमार्फ़त मनपा क्षेत्रातील नागरिकांना टॅकरव्दारे पाणीपुरवठा करण्याचे काम केले जाते सदर कामाकरीता "टॅकर भाडे" yaa laoKaiSaYaa-KalaI sana २००६–०७ yaa vaYaa-cyaa Aqa-saMklpat $.५०.०० लक्ष एवढी तरतुद करण्यात आली आहे. मात्र सदर तरतुद अपुरी पडत आहे.या करीता "वितरण व्यवस्था व किरकोळ खरेदी / दुरुस्ती" yaa laoKaiSaYaa-KalaIla $.५०.०० laxa [tkI r@kma "टॅकर भाडे" yaa laoKaiSaYaa-KalaI vaga- krNaosa मा. स्थायी समिती सभेस शिफारस करणेत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५३ चे वाचन केले.)

**मा. आयुक्त :-**

सोबत यादी जोडलेली आहे का?

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यात कमी जास्त असेल तर सांगा. आणखीन वाढवा.

**जयंत पाटील :-**

इथे तुम्ही लिहलं आहे. भाईंदर पूर्व नवघर गावातील महादेव मंदिर. तर नवघर गावात कुठे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, याच्यामध्ये मागे मी दोन प्रस्ताव दिले होते की, आमच्या बालाजी नगरमध्ये ६ इंच पाईप ऐवजी ८ इंची पाईप लाईन टाकणे कारण त्यांचे अनेक टॉवर उभे राहिल्याने प्रत्येक टॉवरमध्ये जवळजवळ १० ते १५ कनेक्शन जवळ जवळ असल्यामुळे पाणी येत नाही आणि हनुमान नगर झोपडपट्टी तिथे २ इंचाची पाईप लाईन ते सुध्दा नमुद करा. त्या लोकांना देखिल पाणी कमी मिळते.

**जेन्वी अल्मेडा :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलत आहे की, प्रकरएा क्र. १५३, १४ ते २० त्याच्यात एक इन्क्लूड करा की उत्तन स्टेला मॉरीस हॉस्पीटल समोरील रस्ता तिथे जलवाहिनी टाकणे. चार्ली डिसोझाच्या घरापर्यंत हे पण त्यात इन्क्लूड करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

माझी ही सुचना नमुद करा की, रावल नगरमध्ये चार इंचाचे आहे तिथे हायड्रोलिक प्रेशर चेक करुन तिथे सहा इंचाची लाईन वाढवून घ्यावी.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य सुचवित आहेत की, येथे पाईप लाईन टाकायची आहे तर घ्यायला सांगा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांच्या नावाची सुची आहे ती यामध्ये नमुद करुन घ्या.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १५३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १५३ :-**

नविन बिडाच्या जलवाहिन्या पुरविणे व अंथरणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. १५६ :-**

मिरा भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरणाकडुन दररोज ८६.०० द.ल.लि. पाणी पुरवठा होतो. सदर पाणी पुरवठा घरांना/ इमारतींना मनपाने ठिकठिकाणी अंथरलेल्या जलवाहिनींद्वारा केला जातो. शहराची झपाट्याने होणारी वाढ लक्षात घेता दिवसागणीक पाण्याची मागणी वाढत आहे. कित्येक ठिकाणी नविन इमारती बांधल्या गेल्या असुन इमारतींमधील रहिवाशांना पाण्याव्यतिरिक्त सर्व सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. या इमारतींना पाणी न मिळण्याचे प्रमुख कारण सदर भागात जलवाहिन्या अंथरल्या नसल्याचे आहे. तसेच काही ठिकाणी जलवाहिन्या फार जुन्या झाल्याने अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. तर काही ठिकाणी ग्रामपंचायत काळातील सिमेंटच्या जलवाहिन्या अस्तित्वात आहेत. अस्तित्वातील काही बिडाच्या जलवाहिन्या कमी व्यासाच्या असल्याने पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होऊ शकत नाही. काही प्रभागात जलकुंभापासुन येणाऱ्या जलवाहिन्यांचे इमारतीं पासुनचे अंतर फारच दुर पडते. परिणामी जलवाहिन्या अंथरलेल्या असुनही त्यावरील जलजोडण्यांना अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. वरील समस्यांमुळे लोकप्रतिनिधि व नागरीक यांच्या तक्रारींचा तगादा सुरूच असतो.

वरील समस्या दुर करणे करीता बिडाच्या नविन जलवाहिन्या अंथरणे हाच ठोस उपाय आहे. जेणेकरुन अद्याप जलजोडण्या प्राप्त न झालेल्या इमारतींना जलजोडण्या देणे शक्य होईल. तसेच पाणी पुरवठा दाबातही लक्षणीय फरक पडु शकेल. सिमेंटच्या जुन्या जलवाहिन्या बदलुन बिडाच्या जलवाहिन्या अंथरल्याने पाणी पुरवठा योग्य दाबाने होऊन तसेच गळतीमुळे होणाऱ्या साथीच्या रोगांना वाव राहणार नाही व पाण्याची बचत होईल जलकुंभापासुन दुरचे अंतर टळल्याने पाणी पुरवठ्यात निश्चितच सुधारणा होऊ शकेल. अशा प्रकारे उपलब्ध पाणी पुरवठ्याचे योग्य प्रकारे नियोजन व वितरण करणे शक्य होईल.

याकरीता शहरात विविध ठिकाणी बिडाच्या जलवाहिन्या पुरविणे व अंथरणे कामांची प्राकलने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जिल्हा दरसुची नुसार तयार करण्यात आलेली असुन या कामासाठी **रू.३,१३,२२,९२३/-** इतका अंदाजित खर्च अपेक्षीत आहे. सदर प्राकलनानुसार होणाऱ्या खर्चाच्या तपशीलाची यादी पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | भाईंदर (प) मोदी पटेल रोड समांतर व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ६,४३,३६०/- |

| | | |
|---|---|---|
| २. | भाईंदर (प) येथील राम मंदीर रोड व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ३,२८,८३४/- |
| ३. | भाईंदर (प) मोदी पटेल रोड ते बॉम्बे मार्केट पर्यंत व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ५,८४,५२१/- |
| ४. | भाईंदर (प) येथील वेंकटेश पार्क व परिसरात येथे जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,६७,६७२/- |
| ५. | भाईंदर(प.) जमुनाबाई ठाकुर मार्ग येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ७,६३,४९३/- |
| ६ | भाईंदर (प) येथील क्रांती नगर (हनुमान मंदिर) मागे व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ९,९७,०५२/- |
| ७ | भाईंदर (प) येथील आनंद नगर व परिसरात येथे जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ९,१७,७२५/- |
| ८ | भाईंदर (प) येथील भोला नगर येथे व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ९,६८,९२६/- |
| ९ | भाईंदर (प) येथील आंबेडकर नगर येथे व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ९,०६,५६४/- |
| १० | भाईंदर (प) मुर्धा येथील शिवप्रसाद आगर येथे व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ६,०५,६८५/- |
| ११ | भाईंदर (प) मुर्धा येथील बुबु आगर येथे व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ५,५२,८८३/- |
| १२ | भाईंदर (प) मुर्धा येथील मोठा आगर येथे व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ६,४८,२७१/- |
| १३ | भाईंदर (प) येथील सदानंद नगर व रेवा नगर येथे व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ४,९४,४९९/- |
| १४ | उत्तन विभागात माहे तलाव ते रिजवान स्कुल पर्यंत व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ६,६३,०६६/- |
| १५ | उत्तन विभागात तलाठी ऑफीस ते ॲलेक परेरा यांच्या घरापर्यंत व परिसरात जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ६,७३,१२४/- |
| १६ | उत्तन विभागात नवी खाडी येथे जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,०६,८१५/- |
| १७ | उत्तन विभागात लाईट हाऊस भाटेबंदर येथे जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ९,६४,०६९/- |
| १८ | उत्तन विभागात वेलंकणी चर्च येथे जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,३४,५७५/- |
| १९ | उत्तन विभागत धारावी मंदिर क्रॉसींग ते चौक जेटी पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,८१,९७८/- |
| २० | उत्तन विभागात पातान बंदर येथे जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ९,८८,५१९/- |
| २१ | काशी मिरा रोड वरील सिल्व्हर पॅरेडाईज येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ५,३८,५७०/- |
| २२ | भाईंदर (पु) प्रभागातील गॅस गोडाउन येथ बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ७,१२,२७०/- |
| २३ | भाईंदर (पु) विभागातील क्वीन्स पार्क कनाकीया रोड व इतर परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,६६,४७०/- |
| २४ | भाईंदर (पु) विभागातील गावदेवी चाळ नवघर गाव येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. १,३३,५३०/- |
| २५ | भाईंदर (पु) विभागातील गोडदेव नाका ते मधुबाला रेस्टॉरेंट पर्यंतची जुनी सिमेंट जलवाहिनी बदलुन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. ८,३८,४८०/- |
| २६ | भाईंदर (पु) विभागातील हनुमान मंदिर ते प्रथमेश इमारत व जैन नगर मधील बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,२४,६३०/- |
| २७ | भाईंदर (पु) विभागातील साईकृपा कॉम्पलेक्स ते न्यु गोल्डन नेस्ट रोड पर्यंत नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,२७,९१०/- |
| २८ | भाईंदर (पु) विभागातील आयडीयल पार्क ते न्युगोल्डन नेस्ट पर्यंत उर्वरीत नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ८,६३,६२०/- |
| २९ | भाईंदर (पु) विभागातील राजा रामदेव पार्क व निर्मल पार्क परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. २,९७,०२०/- |
| ३० | भाईंदर (पु) विभागातील नवघर रोड येथील लोढा कॉम्पलेक्स व इतर परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ७,९५,६७०/- |
| ३१ | जनता नगर (काशी) येथे निलकमल हॉटेल ते नविन सेप पर्यत २०० मि.मि व्यासाची सि.आय जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रु. ९,१६,८६६/- |
| ३२ | आयडीयल टॉवर ते पार्श्व नगर पर्यंत सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ३,९२,९७२/- |
| ३३ | लक्ष्मी भाग (काशी) वेर्स्टर्न हॉटेल येथे १५० मि.मि व्यासाची सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ३,५७,८५१/- |
| ३४ | मिरा गावा मधील जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलुन नविन सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ५,०२,६६५/- |

| | | |
|---|---|---|
| ३५ | वर्सोवा जलकुंभ ते मनपा शाळा व जैन मंदिर येथील सिमेंटची जलवाहिनी बदलुन सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ६,४०,७४०/- |
| ३६ | चेना गाव मध्ये जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलुन नविन सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ५,०२,४१४/- |
| ३७ | स्टेट बँक ते विष्णु मंदिर (मिरा गाव) येथील जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलुन सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ९,४५,४४२/- |
| ३८ | काशी गावामध्ये १०० मि.मि व्यासाची सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. २,५९,३४४/- |
| ३९ | जनता नगर काशी ते माशाचा पाडा रस्ता येथे सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. २,५५,९१५/- |
| ४० | मुन्शी कंपाउंड (मिरा) येथे सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ३,९५,६३७/- |
| ४१ | आझाद नगर (मिरा रोड) येथे १०० मि.मि. सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ३,२२,३८७/- |
| ४२ | मिरा रोड (पु) गावदेवी नगर नं.१ येथे सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. १,२७,७१५/- |
| ४३ | शिवओम हॉस्पीटल ते गिता नगर फेज ६ पर्यंत १०० मि.मि. व्यासाची सी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. २,२१,५०८/- |
| ४४ | भाईंदर (पु) येथील श्रीनाथ भवन ते लक्ष्मी नगर नं.२ व परिसरात बिडची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. ५,२४,७७०/- |
| ४५ | गोडदेव स्मशान रोड येथे पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ४८,१५९/- |
| ४६ | मिरा रोड पुर्व येथील रॉयल कॉलेज ते सृष्टी से.नं.२ येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ९,२७,००२/- |
| ४७ | भाईंदर पुर्व विभागातील काशीनगर परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. २,९७,०२०/- |
| ४८ | भाईंदर (पु) नवघर टाकी जवळील शिवशक्ती नगर परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू. २,९७,०२०/- |
| ४९ | भाईंदर पुर्व नवघर गावातील महादेव मंदिर व परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. १,३३,५३०/- |
| ५० | भाईंदर (प.) जैन मंदिर जवळील देवचंद नगर परिसरात बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. १,३०,४००/- |
| ५१ | भाईंदर (प.) बालाजी नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ४,०२,९६५/- |
| ५२ | भाईंदर (पु.) रावळ नगर येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ३,६४,१५०/- |
| ५३ | मिरा रोड (पु.) प्लेझंट पार्क येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू. ५,६६,६५०/- |
| | **एकुण खर्च** | **रू.३,१३,२२,९२३/-** |

महानगरपालिकेच्या सन २००६-०७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात **"नविन जलवाहिनी टाकणे" (रु. ६००.०० लक्ष )** या लेखाशिर्षाअंतर्गत उपरोक्त खर्चाची (अनु. क्र. १ ते ५०) तरतुद करण्यात आलेली आहे. उपरोक्त कामाच्या प्रस्तावाची रक्कम पाईप व मजूरी दर एकत्रित करून आहे. तथापी या पुर्वीचा अनुभव पाहता पाईपसे बाजार भावातील दर हे जिल्हादर सुचीमधील दरापेक्षा फारच जास्त असल्याने सदर कामास प्रतिसादर मिळालेला नाही. याकरिता उपरोक्त कामाकरिता लागणारे पाईप स्वतंत्ररित्या पाणी पुरवठा विभागामार्फत निविदा मागवून खरेदी करणेस व उपरोक्त कामाअंतर्गत जलवाहिनी अंथरण्याचे मजूरी काम स्वतंत्ररित्या निविदा मागवून करून घेणेस मा.स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५४ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

याचा गोषवारा कुठे आहे?

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांचे पत्र आहे.

**रोहिदास पाटील :-**

गोषवारा देणं ही त्यांची इच्छा. पण मी जे पत्र दिल होत ते खरं आहे. या स्थायी समितीसमोर हा विषय घ्या. म्हणून साहेब, एक असा विषय आहे की, भाईंदर पूर्वेला आपण दशक्रिया विधीसाठी शेड

नगरपरिषदेने बनविले होते. बनल्यानंतर परत ते नादुरुस्त झाले त्याची वहिवाट संपली इतकी नादुरुस्त झाली की आता तिथे कुणीच जात नाही. मग नाईलाजाने आम्हाला सर्व पुर्वीच्या लोकांना पश्चिमेला धक्क्यावर यावे लागते. तिथे येउन आम्ही विधी करतो. आपला नादुरुस्ती शेड आहे. आपल्याला एका संस्थेने विनंती केली आहे की ३ लाख रुपये खर्च करुन ते शेड दुरुस्त करुन लोकांना जो विधी करायचा असतो दशक्रिया विधी तो विधी होण्यासाठी आपण अर्ज दिला आहे.

**हंसुकूमार पांडे :-,**

यह सार्वजनीक काम है ना। इसमे संस्था काम नही करेगी इस काम को महानगरपालिका करेगी। चौपाटी के उपर जो भी सुविधा चाहिए। समझो पाणपोई चाहिए और शौचालय चाहिऐ। पोलिस चौकी चाहिऐ।

**रोहिदास पाटील :-**

वह इसमे नही है।

**हंसुकूमार पांडे :-**

वही सब विषय है।

**शशिकांत भोईर :-**

आधुनिक तऱ्हेने बनविता जी संस्था ३ लाख रुपये खर्च करेल त्या पेक्षा जास्त महानगरपालिकेने खर्च केले तर तिथे आणखीन सुखसोयी उपलब्ध होउ शकतात. ते महानगरपालिकाच्या खर्चानेच करावे.

**दिपक खांबित :-**

प्रविण समाजसेवा मंडळाने मागणी केली होती. माझ्या मते मागे आपण दि. ७/१२/२००४ च्या मिटींगला विषय आणला होता. तेव्हा असा ठराव झाला की, दशक्रिया विधी शेडची दुरुस्ती महानगरपालिकाच्या मार्फत करण्यात यावी. सदर शेड कोणत्याही संस्थेस देण्याचा ठराव झाला नव्हता. परंत पुन्हा त्या संस्थेने मागणी केली आहे की, आम्हाला द्या आम्ही चांगल मेन्टेन करतो. पुन्हा त्यांनी मागणी केली आहे.

**शशिकांत भोईर :-**

महानगरपालिका सक्षम नाही का? महानगरपालिकेलने जर खर्च केला तर.....

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मी सांगतो पण जेव्हा त्यावेळी २ वर्षापुर्वी एका संस्थेने मागणी केल्यानंतर याच सभागृहाने ते नाकारल आणि २ वर्ष ते पुन्हा विसरले. आता त्या दिवशी एकसरचे आता आम्ही तुम्हाला हे माहित असेल आमचे कुटूंब कूठपर्यंत आहे. एकसरची मोठ्या घरातील लोक आली. सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, पाटील साहेब आम्ही सगळे होतो परत हा चर्चेस विषय आला सगळ्या पुर्वेच्या लोकांना पश्चिमेस यावे लागते आणि पुर्वेला कोणी क्रॉस करु शकत नाही आता रेल्वे प्लॅटफॉर्मवर बॅरेकेट लावल आहे त्यामुळे पुर्वेच्या लोकांना पश्चिमेकडे येण्याच मरणाच झाल आहे असे असतानां तिथे तो विषय निघाला आणि सन्मा. पाटील साहेबांनीच सांगितल (काका) पुन्हा पत्र द्या आणि मी पत्र दिले आहे आता नाकारल तर मला जरासुध्दा वाईट वाटणार नाही पण एका चांगल्या योजना आपण करतो आणि कुठेतरी.............

**तुळशीदास म्हात्रे :-**

नाकारण्याचा विषय येत नाही. महानगरपालिका ते काम करणार आहे. महानगरपालिकेने ताबडतोब ते काम चालु करावे.

**हंसुकूमार पांडे :-**

महानगरपालिकेने हे काम करावे.

**दिपक खांबित :-**

सुलभ शौचालय , पाणपोई, खेळणे वैगरे बसवायला सुध्दा नगरसेवकांनी मागणी केली होती.

**जयंत पाटील :-**

तो वेगळा भाग आहे.

**दिपक खांबित :-**

मी आपल्याला माहिती देतो या विषयाच्या अनुषगांने जी जागा कलेक्टरची असल्यामुळे आपण तिथे परवानगी देउ शकत नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ती हस्तांतरीत केली नाही हे तुमच खरं आहे. पण आपण जो विषय आणला तो कोणत्या अनुषगांने आणला . हा सदरचा विषय कोणत्या अनुषगांने आणला.

**दिपक खांबित :-**

परवानगी देवु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

परवानगी दिलेल पत्र वाचुन दाखवु का? तुम्हीच परवानगी दिलेली आहे. मा. आयुक्त साहेबांची सही आहे.

**मा. आयुक्त :-**

होय, मला माहित आहे. याबाबत कालच चर्चा झाली होती.

**जयंत पाटील :-**

म्हणजे तुम्ही एका गोष्टीला परवानगी नाकारता. कलेक्टर आणि सी. आर. झेड चे नियम दाखवता आणि दुसरी कडे परवानगी देता साहेब, मंजुर आहे त्याबद्दल मला दुःख नाही परंतु परवानगी देताना चांगली जी कामे असतील . आपण सांगा की आम्ही कानाडोळा करतो तुम्ही बनवा.

**मा. आयुक्त :-**

लोकांच्या सुविधासाठी असेल तर बरे ना.

**जयंत पाटील :-**

मीच म्हणतो साहेब, मुळात तुमच पत्रच चुकीच आहे. ते दुरुस्तीसाठी दिलेल आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

दुरुस्ती साठी देतात आणि नविन शेड उभारतात.

**जयंत पाटील :-**

दुरुस्ती केली जाते तर ते तिकडे आहे. ते मुळातच नाही. त्याच्यामुळे हे पत्र रद्द होईल नंतर मग मागणीजी आहे आणि सन्मा. सदस्य शानु गोहिलची पोलिस चौकीची मागाणी ह्या सर्व सुविधा शहरामध्ये करायला पाहिजेत.

**दिपक खांबित :-**

ते रद्द केले म्हणुन नविन परमिशन दिलीच नाही.

**जयंत पाटील :-**

रद्द अशाकरिता करतात की, हे चुकीचे दिलेले आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

त्यांचे पत्र कसे आहे ते आपण बघा ना. तिथे पाणपोई आहे व ते दुरुस्त करण्याचे पत्र दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

खांबित साहेब, तुम्ही अस म्हणता की...............

**मा. आयुक्त :-**

काल संध्याकाळी याविषयावर माझी चर्चा झाली आहे ते आपले सभागृह संपल्यानंतर जेव्हा मी संध्याकाळी माझ्या केबीनमध्ये बसलो तेव्हा हो विषय माझ्या समोर आला आणि त्यानंतर संबधितांना मी बोलावुन विचारल की तुम्ही असं-असं दिल आहे का? तर मी हे एकाला दिले असेल तर दुसऱ्याला दिल पाहिजे. मला खुलासा करु द्या. जर समजा त्याच पर्टीकुलर एरिया मध्ये जर २ किंवा ४ लोकांनी एखाद्या गोष्टीसाठी मागणी केल्यानंतर फक्त एकालाच परवानगी देणार का? द्यायची असेल तर चौघांना द्यायला पाहिजे एकाला नाही द्यायला पाहिजे. आणि नजर चुकीने जर एकाला दिली गेली आहे तर आपण ती रद्द करत आहे की, बाकीच्या तिघांना परवानगी देउ शकत नाही असे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही काहीतरी वेगळं सांगता आमचे म्हणणे असे आहे की रद्द करण्याच कारण वेगळं आहे. तुम्ही दुरूस्तीची परवानगी दिली आहे म्हणून तुम्ही रद्द करा. हे तिकडे नाहीच आहे.

**मा. आयुक्त :-**

तेच सांगत आहे. दुरूस्तीची परवानगी दिली आहे. परंतु, प्रत्यक्षात त्या ठिकाणी दुरूस्ती नाही हे लक्षात आल्यानंतर ते आपण रद्द करतो.

**जयंत पाटील :-**

म्हणून हे रद्द करता तुम्ही.

**हंसुकूमार पांडे :-**

हम अच्छा काम कर रहे है। इसलिए परमिशन देने आपका काम है।

**रोहिदास पाटील :-**

साहेब, दशक्रिया विधीचे नक्की काय? निर्णय घ्या. पुन्हा-पुन्हा तुम्ही शेड दुरूस्ती करायला परवानगी देतात की नाही देतात. ही सभा देता येईल की नाही. नसेल तर तुम्ही त्याचा विरोध नोंदावा आम्ही दोघं ठराव मांडतो.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण असे कशाला बोलता विरोध विरोध.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील तुम्ही मा. आयुक्तांशी या विषयावर बोला. आमचा विरोध कुठे आहे? याला कोणाचाही विरोध नाही.

**रोहिदास पाटील :-**

मी त्यांनाच विचारतो.

**हंसुकूमार पांडे :-**

त्याला कोणाचाही विरोध नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही त्याचा खुलासा करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

महानगरपालिका पैसा बचता था। तभी करनेका तब किया नही। यही सभागृहने बोला था। आप लोगो को किसीको जलन होगी तो बोला नही देने का।

**हंसूकूमार पांडे :-**

यह जलन की बात नही है।

**रोहिदास पाटील :-**

याच सभागृहात दोन वर्षापूर्वी सांगितले होते.

**मा. सभापती :-**

तुम्हांला खुलासा पाहिजे आहे तो मी करतो. मा. आयुक्त साहेब जरा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये खुलासा करणार यापेक्षा आपण निर्णय घ्यायचा. जो विषय आलेला आहे. तो विषय विषयपटलावर आलेला आहे. त्या विषयावर आपण निर्णय घ्यायचा असतो. त्याच्यामध्ये प्रशासनाकडून गोषवारा द्यायला पाहिजे होता. किंवा गोषवारा दिला गेला नाही. समजा तो विषय परस्पर आलेला आहे. त्या विषयावर चर्चा करा. तुम्हाला नेमक काय पाहिजे आहे. त्याच्यावर अंतिम निर्णय घ्यायला पाहिजे. पॉलिसी असेल तर पॉलिसीबद्दल मी काहीच म्हणू शकत नाही.

**मा. सभापती :-**

आपल्याला काय पाहिजे तर गोषवारा पाहिजे असे असेल तर सांगा मी पुढच्या वेळेला रितसर विषय आणायला तुम्ही असे सांगा ना.

**रोहिदास पाटील :-**

तुमची इच्छा. आपल्याला फक्त लेखी परवानगी पाहिजे ती संस्था खर्च करते.

**मा. सभापती :-**

म्हणजे यांचे म्हणणे आहे की, आपण परवानगी देउु शकत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही सांगता लेखी परमिशन पाहिजे. पण जागा माझी नाही मी कशी परमिशन देणार.

**रोहिदास पाटील :-**

दशक्रियाविधीच आपले शेड आहे. तेच तुम्हाला माहीत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

शेड आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

महानगरपालिकेने बनविलेल होत. नगरपरिषदे असताना बनविल होत. तद्नंतर तिथे गॅमन इंडियाचे रितसर बांधकाम झाल्यामुळे नंतर त्या शेडचा वापर झाला नाही. शेड अस्तित्वत आहे. त्यावर डागडूजी केली आहे. महानगरपालिकेले आणखीन खर्च करुन.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मंजुर, देउुन टाका परमिशन. त्यांना परमिशन द्या ना.

**हंसुकुमार पांडे :-**

सभापती साहब, आप ऐसा कैसा प्रायव्हेट संस्था को परमिशन दे सकते हो? महानगरपालिका काम करने मे सक्षम नही है क्या? पाच, छः, लाख रुपया महानगरपालिका लोगो के लिए इतना खर्चा नही कर सकती क्या?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खांबित साहेब, अभी बोलो ना, पाच लाख बच रहा है ऐसा। बच जाएगा तो वह दुसरे वॉर्ड में....

**हंसुकुमार पांडे :-**

खड्डा खोदके फालतु में डालते है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर है।

**दिपक खांबित :-**

डिसिजन आप लोगों को लेने का है। ॲप्लिकेशन आया है। वह आपका बोला है की, ऐसा ॲप्लिकेशन आया है।

**हंसुकुमार पांडे :-**

ॲप्लिकेशन तो बहूत आते है। आप उन सबको मंजुरी देते है क्या? प्रायव्हेट संस्था को मंजुरी देते है क्या।

**दिपक खांबित :-**

नए को नही दे सकते है ना? कलेक्टर लॅन्ड है तो।

**हंसुकुमार पांडे :-**

ऑलरेडी नगरपालिकेकी जगह है। उधर शेडस् बना हुआ है। वह आप प्रायव्हेट संस्था को देके.......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ते मागे ठराव क्र. १५३ मध्ये जो ठराव केला होता. पाईप लाईन टाकण्यासंदर्भात त्याच्यामध्ये ठराव वाचुन कायम करतो आणि तात्काळ त्याची अंमलबजावणी करायला प्रशासनाला सांगतो.

**मा. सभापती :-**

याविषयाचा रितसर गोषवारा आणा. त्याच्या नंतर हा विषय घेउुया.

**रोहिदास पाटील :-**

परवानगी दिली का?

**मा. सभापती :-**

तुम्ही तो ठराव मांडा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो ठराव मांडू.

**मा. सभापती :-**

आपण ठराव मांडणार आहात का?

**रोहिदास पाटील :-**

होय भाईंदर पुर्वेच्या नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने दशक्रिया विधी, अन्य-अन्य विधी करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेच्या वतीने बनविण्यात आलेल शेड अनेक वर्षे ते नादुरुस्त झाले होते. हे शेड प्रविण समाज सेवा मंडळाने ३ लाख रुपये खर्च करुन दुरूस्तीची या सभेसमोर परवानगी मागितलेली आहे. तरी तुम्ही परवानगी द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

**डॉ. रमेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, उधर किसी प्रायव्हेट संस्था का बोर्ड लगा दिया तो राजकारण करनेका मतलब नही है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये कुठल्याही राजकीयपक्षाच्या माणसाच नाव किंवा राजकीय पक्षाच नाव नसले पाहीजे.

**रोहिदास पाटील :-**

मंजुर.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर.

**हंसुकुमार पांडे :-**

श्री. खांबित साहेब, मग आम्हाला प्ले ग्राउंड, शौचालय, पाणपोई ह्याची पण परवानगी द्या ना. ऐसा नही है। नए को परमिट दे रहे हो तो पाणपोई भी हमलोग पब्लिक के सोय के लिए बना रहे है ना?

**जयंत पाटील :-**

यांच्या सोबत ज्यांनी जी मागणी केलेली आहे. प्याउुची मागणी केलेली आहे. अंजु पाटील ह्यांनी व पोलिस चौकीची ही मागणी केली आहे. त्याला आपण मान्यता द्या.

**मा. सभापती :-**

आपण तसा ठराव करा व त्याच्यात नमुद करा. विषय घ्या.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये संबंधीत नगरसेवकांची जी काही पत्रे आली असतील त्या पत्रांना प्रशासनाकडून उत्तरे दिली असतील ना.

**शशिकांत भोईर :-**

नाही दिले फक्त उत्तर देतात की, जागा हस्तांतरीत झालेले नाही. जिल्हा अधिकारी कार्यालयातुन आपल्याला ती जागा हस्तांतरीत झालेली नाही.

**मा. आयुक्त :-**

जर जागा हस्तांतरीत झाली नसेल तर आपण परवानगी कशी देणार?

**शशिकांत भोईर :-**

कोणतीच परवानगी देउ नका. तुम्ही स्पष्ट बोला तुम्ही ती नाकारा. तुम्ही एका ठिकाणी शेड डेव्हलप करायला परमिशन देतात. मग दुस-याला परमिशन का देत नाही?

**हंसुकूमार पांडे :-**

तुमच्या अधिका-यांना तुम्ही कसे काय परवानगी देता.

**मा. आयुक्त :-**

कोणाला परमिशन दिली?

**शशिकांत भोईर :-**

आता ठराव तोच आहे ना.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही ठराव करतानां का आणि ठराव कसा करायचा ते तुम्ही ठरवायचे. यात मी काय करणार आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

मंजुर कसे होउ शकते? तुम्ही एकाला मंजुरी देतात आणि दुस-याला देत नाही असे थोड होउ शकतं?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य हंसुकूमार पांडेजी ठराव कोण मांडत आहे आणि ठरावास मंजुरी कोण देत आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबां मी ठराव नाही मंजुर केला.

**मा. आयुक्त :-**

आपण असे कसे म्हणता?

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ठराव मंजुर झाला ना.

**जयंत पाटील :-**

साहेब, माझे म्हणण अस आपण प्रशासकीय अधिकारी........

**मा. आयुक्त :-**

या बाबतीमध्ये तुम्ही मला विचारा ना. तुम्ही ठराव मांडत आहेत तेव्हा विचारा ना, तुम्हाला तुमच्या प्रशासनाचे मत काय मांडायचे आहे का? हे तुम्ही मला सांगत नाही? तुम्ही असे कसे बोलता? असे कसे चालेल.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, तुम्ही आता बोला ना, तुमचे काय मत आहे?

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये मी सभागृहाला एवढेच सांगु इच्छितो की, ही सदरची जागा ही कलेक्टर लँन्ड आहे. कलेक्टर साहेबांनी ती जागा अद्याप पर्यंत आपल्या कडे हस्तांतरीत केली नाही. ठीक आहे. या पुर्वी किंवा महानगरपालिकेच्या आधि थोडी - थोडी काही - काही ठिकाणी विकास झाला असेल. त्या ठिकाणी भराव झाला असे म्हणा किंवा गणपती विसर्जनाची सोय केली असेल किंवा अन्य प्रकारच्या सुविधा झालेल्या असतील. त्या सुविधांच्या बाबतीमध्ये आपण कायदेशीर मार्गाने जर पाहिले तर त्या ठिकाणी आपण परवानगी देउ शकणार नाही. किंवा कोणाला विकास करायला आपण परवानगी देउ शकणार नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ठराव आपण याठिकाणी आणला शकला? जागा आपली नसताना आपण याठिकाणी ठराव कसा काय आणू शकता?

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये सन्मा. सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, हे मा. सभागृहामध्ये ठराव आणयचा की नाही. हे आपण ठरवायचे आहे. तो ठराव जेव्हा माझ्याकडे अंमलबजावणी करण्यासाठी येईल त्याच्यानंतर त्याची अंमलबजावणी करायची की नाही तो नंतरचा विषय आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

महानगरपालिका का मान नही रखके हमलोग व्हिदाउट परमिशन उसको बनाऐ क्या?

**मा. आयुक्त :-**

मै वही तो बोल रहा हुँ की, मै परमिशन नही दे सकता हुँ ।

**शशिकांत भोईर :-**

साहेब, याच्यामध्ये माझ दुसरे म्हणणे असे आहे की, आपण हायमार्कच्य जेवढे ५ - ५ लाख रुपयाचे दिवे तिथे लावले, रस्ता बनविला तो पैसा वाया जाईल ना. त्याच्यामध्ये महानगरपालिकाचे आर्थिक नुकसानच आहे.

**मा. आयुक्त :-**

तेच मी यापुर्वी सांगितलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

जिल्हा अधिका-यांने आपल्याला जागा अजुनही हस्तांतरीत केली नाही. तो पैसा वाया गेला. आज आपण तो शेड नगरपालिकेच्या कारकीर्दीत केला होता. तो आपण डेव्हलप करायला दिला तरी ते आपण चुकीच्या मार्गाने मंजुरी देणार व बनवला जाईल .

**जयंत पाटील :-**

सगळ्या गोष्टी चाललेल्या आहेत तो या शहरातील जनतेसाठी चाललेले आहे. आम्हाला हे मंजुर आहे की, ती जागा कलेक्टरची आहे. कलेक्टरच्या अंडर आहे. कलेक्टर शेवटी आपलेच आहेत. 'सर्व भुमी गोपाल की.' पोलिस स्टेशन बनणं आवश्यक आहे. पाण्याच प्याउ बनणं आवश्यक आहे. आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी जो विषय पाटील यांनी जो विषय आणला तो ही आवश्यक आहे. शौचालय बनणे आवश्यक आहे. त्या गोष्टी जनतेसाठी आहे. तिथे कोण कोणाच घर बांधत नाही आणि कुठल्या त-हेची अडचण येत असेल तर आपण तिकडे जा. टेक्नीकली कलेक्टरचा काही पॉईंट असेल ते शेवटी सांभाळायच्या आपणच या गोष्टी व्हायला पाहीजेत.मी दोन्ही बाजुने नाही बोलत. मी एकाच बाजुने बोलत आहे. सभांळायला आपणच आहोत आपण सक्षम आहोत. सक्षम हा शब्द वापरतो. तेव्हा या सर्व गोष्टीनां आमच्या ठरावात मंजुरी द्या.

**मा. आयुक्त :-**

यापेक्षा आपण एक काम करुया की, या ठिकाणी सभागृहाच्या ज्या भावना आहेत किंवा नागरिकांना होणारी गैरसोय किंवा अडचण या संदर्भामध्ये आपण नविन जिल्हाअधिकारी आलेले आहेत श्री. जंत्रे साहेब त्याच्याकडुन आपण त्यांची वेळ घेउया. आपण सर्वांनी त्यांच्याकडे जाउन विनंती करुया . आपण तो प्रस्ताव ऑलरेडी त्यांच्याकडे पाठविलेला आहे. एक काय होत या ठिकाणी सोयी - सुविधा देण्यासाठीही आपल्यावर बंधन येत की जर समजा, ती जागा आपली नाही तर सन्मा. सदस्यांनी प्रश्न विचारला की, आता पर्यंत तिथं जे खर्च झालेला आहे तो सर्व खर्च बेकायदेशीर का? या प्रश्नावर आपण उत्तर देउ शकत नाही ना.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आता मध्यंतरी काही तरी चबूतरा बांधला हे सगळं अनिधीकृत मग, शौचालय, पाणपोई, पोलिस चौकी आहे त्यांना तरी तुम्ही मौखिक जागा द्या. नंतर तुम्ही पाठवाल हातोडे घेउन की, हे तोडा, ते तिकडे आज चबूतरा बांधला आहे. तो पण अनिधीकृत झाला आहे? मग, तो का नाही तोडत सगळेच असेच होणार आहे ना जर काही संस्था किंवा सेवाभावी संस्था बनवत असतील आपण त्यांना न्याय देणार आहेत तर सर्वांनाच न्याय द्या ना.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण जे सांगत आहात हे सगळं आपणच करत आहोत. आपण आपल्यावर बंधने घातली पाहिजेत. शेवटी कायद्याप्रमाणे आपण महानगरपालिका चालवतो किंवा कायद्याप्रमाणे चालयला पाहिजे. आपली जर स्वतःची भूमिका असेल तर प्रत्येकाने तो विचार करायला पाहिजे ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपल्या मताशी मी सहमत आहे. तो चबूतरा बांधला आहे तो अनिधिकृत आहे. तुम्ही त्याच्यावर काही ॲक्शन घेतली का?

**मा. आयुक्त :-**

आपण ॲक्शन घेउ ना.

**शशिकांत भोईर :-**

कधी?

**मा. आयुक्त :-**

घेउ ना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मागील स्थायी समितीत हा विषय आलेला होता.

**ग्रिटा फॅरो :-**

दोन मिटींगपासून हा विषय चालू आहे.

**शशिकांत भोईर :-**

या ठिकाणी एकाला न्याय मिळतो तर दुस-याला न्याय मिळत नाही पोलिस चौकी, शौचालय, पाणपोई बनणं गरजेचं आहे. कारण तिथे नागरिक फिरायला येतात.

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यावर कोणत्याही पक्षाचं नाव येणार नाही. असे पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

एक अति महत्त्वाचा विषय सांगतो की, त्यादिवशी मा. सभापती महोदय सन्मा. सदस्य जयंत पाटील सुद्धा तिथे होते आणि सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ही होते. डी.आर.एम. च्या केबिनमध्ये गेले होतो. डी.आर.एम साहेबांनी तात्काळ श्री. धनंजय साहेबांना पाठविलं त्यांनी बंदरवाडीच्या सबवेला कोणताही तांत्रिक अडथळा येणार नाही असे त्यादिवशी तोंडी सांगितले आणि त्याचवेळी एक विषय आला की, भाईंदर पश्चिमेकडून लोक रेल्वेच्या ब्रिजवरून चढतात आणि वर चढली की, टि.सी त्यांना पकडतात. आम्ही त्यांना फार विनंती केली सगळ्यांनी विनंती केली मा. महापौरांनी सिटी इंजिनियर यांनी केली त्यांना कुठेतरी कन्सेशन द्यायला पाहिजे की ती लोक बाहेर पडली पाहिजे. पूर्वेकडून, पश्चिमेला आणि पश्चिमेकडून पूर्वेला जायला रस्ता नाही. मग, त्यावेळी असे ठरले की, तेव्हा तुम्ही कोणतीही तरतुद दिली नाही त्याच्या मध्ये तुम्ही फूटवर ब्रिज मागा. तर तिथे जागा सफीशिएंट नाही जेणेवरून पूर्वेचे पश्चिमेस जायला होईल त्यांचे तुम्हाला

पत्र दिलेले आहे. त्याचे या सभेत ठराव करायचा असेल तर ह्या सभेत करा. सन्मा. सदस्य पाटील साहेब सन्मा. हंसूकूमार पांडेजी इस सभेमें ठराव किजिए या दुसरे सभेमें रितसर उसका ठराव लेके विषय लेके ठराव किया जाए। जेणे करुन लेट होउ नये. आपण हा विषय घ्या असे मी सचिवांना सांगतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, सगळ्यांच्या मागणीनुसार आपण एक जॉईंट ठराव मांडू या. ज्या सन्मा. नगरसेवकांनी मागणी केलेली आहे, पाणपोई व चबूतरा बांधण्यासाठी त्यांनाही आपण परवानगी देवूया. आणि त्याचाही ठराव मांडू या.

**मा. सभापती :-**

आपण पुढच्या सभेत हा ठराव मांडू या.

**रोहिदास पाटील :-**

आपण आदल्या मिटींगमध्ये बोललो होतो आमचा कुठेही विरोध नाही. मा. आयुक्त साहेब मी त्यावेळीही बोललो होतो. कोणाला कोणीतरी अपमानित करत असेल तर त्याची काही आवश्यकता नाही.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १५४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**हंसूकूमार पांडे :-**

ह्याला माझं अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गणेश विर्सजनाच्या दिवशी जे खेळणी बसवणार आहे त्याचे गणेश विसर्जनाच्यावेळी आलेल्या लोकांना त्रास किंवा अडथळा होता कामा नये. त्यानुसार तुम्ही प्लॅनिंग करुन खेळणी बसवा असा मी ठराव मांडत आहे.

**हंसूकूमार पांडे :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १५४ :-**

भाईंदर (पू) धक्का येथे नागरिकांना विविध सेवा पुरविणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. १५७ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत भाईदर (पू) धक्क्यावर महानगरपालिकेमार्फत श्री. गणेश विसर्जनाकरीता धक्का रस्ते हायमास्ट इ. व्यवस्था केलेली आहे. महानगरपालिका हद्दीतील नागरीक सदर धक्क्यावर मोठया प्रमाणावर गर्दी करीत असतात. त्यामुळे सदर ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था, सुलभ शौचालय, लहान मुलांना खेळयाकरिता खेळणी, गर्दी सुनियंत्रित करणे करिता पोलीस चौकी बांधणे. आवश्यक झाले आहे. सदर जागा जिल्हाधिकारी यांच्या मालकीची असून हस्तांतरणाची कार्यवाही सुरू आहे. तरी शासन मंजूरीच्या अधिन राहून सदर ठिकाणी पाणपोई, सुलभ शौचालय, पोलीस चौकी, खेळणी इ. कामे महानगरपालिकेमार्फत नगरसेवक निधीतून करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रविण सेवा मंडळास दशविधी कार्याकरिता शेड दुरूस्ती करून वापरण्यास करारनामा करून तीन वर्षाकरिता रू. १/- त्या नाममात्र भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच गणेश विर्जसनाच्या वेळी अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. हंसुकुमार पांडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १५५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १५५ :-**

निविदांस मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. १५८ :-

| A. Ë. | kamaacao naaMvaÀzokodaracao naaMva |
|---|---|
| 1 | imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It koMd` Saasanaacyaa javaahrlaala naoh$ raYT/Iya naagarI punaina-maa-Na AiBayaana AMtga-t SahrI garIbaaMnaa maulaBaUt sauivaQaa purivaNao ³baI.esa.yau.pI.´ yaa yaaojanao AMtga-t koMd` SaasanaacyaaÀrajya Saasanaacyaa maagadSa-k saucanaonausaar JaaopDp+IQaarkasaazI Garkula baaMQaNao¸ maulaBaUt sauivaQaaMkrIta rsta¸ idvaaba<aI¸ saaMDpaNaI¸ paNaIpurvaza¸ galainassaarNa vyavasqaapnaasah p`klp Ahvaala tyaar krNao va %yaa AnauYaMgaanao AavaSyak %yaa JaaopDp+Icao savao-xaNa krNao toqaIla Infra Structure Development krNao¸ jaimanaIcao BaUsaMpadna AavaSyak tI kamao par paDNyaakirta “knsalTMT” naomaNao. |

A´ mao.raNao maonaojamaoMT knsTlTMT p`a.ila.

| Sr.No. | Description | % on Estimate Cost of Projcet | |
|---|---|---|---|
| | | In Figure | In Words |
| १. | Preparation of detailed Project report and approval from consult authorizes (Government) | 2.10% | Two Point Ten Percent |
| २. | Preparation of tender documents & Supervision of Work till Competition of Project | 0.80% | Point Eighty Percent |

**ba´ mao.Aaica-Jama**

| Sr.No. | Description | % on Estimate Cost of Projcet | |
|---|---|---|---|
| | | In Figure | In Words |
| १. | Preparation of detailed Project report and approval from consult authorizes (Government) | 1.85% | One Point Eighty Five Percent |
| २. | Preparation of tender documents & Supervision of Work till Competition of Project | 0.60% | Point Sixty Percent |

**k´ mao.inayaSa**

| Sr.No. | Description | % on Estimate Cost of Project | |
|---|---|---|---|
| | | In Figure | In Words |
| 1. | Preparation of detailed Project report and approval from consult authorizes (Government) | 2.25% | Two Point Twenty Five Percent |
| 2. | Preparation of tender documents & Supervision of Work till Competition of Project | 0.80 | Point Eighty Percent |

varIla pOkI mao.Aaica-Jama yaaMcao dr kmaI AsaUna sadr dracaI inaivadasa mauMba[- p`aMitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 73 ³k´ nausaar maMjaUrI doNyaat yaot Aaho. tsaoca sadr kamaI vaoLavaoLI yaoNaa¹yaa doyakaMcyaa p`danaasa maMjaUrI doNyaat yaot Aaho.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा

ठराव वाचून कायम करण्यात आला

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. १५६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ग्रिटा फॅरा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १५६ :-**

निविदांना मंजुरी देणे. (संगणक विभाग)

**ठराव क्र. १५९ :-**

महानगरपालिका संगणक विभागाकरीता आवश्यक असलेली कंज्युमेबल स्टेशनरी खरेदी करणेकामी दि. १४/११/२००६ रोजी दैनिक सुरजप्रकाश व हमारा महानगर या वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. के.जी.एम. सिस्टीम सोल्युशन | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स | मे. साई प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनरी | मे. वोरा इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Floppy | 230/- Per Box | **220/- Per Box** | 245/- Per Box | 235/- Per Box |
| 2 | Cdr | 28/- Per Nos. | **25/- Per Nos.** | 35/- Per Nos. | 30/- Per Nos. |
| 3 | Cdrw | 170/- Per Nos. | **160/- Per Nos.** | 185/- Per Nos. | 175/- Per Nos. |
| 4 | Magnetic Tap | 4275/- Per Nos. | **4150/- Per Nos.** | 4500/- Per Nos. | 4350/- Per Nos. |
| 5 | Toner Hp LaserJet 1015 (Q2612A) | 6250/- Per Nos. | **6100/- Per Nos.** | 6750/- Per Nos. | 6500/- Per Nos. |
| 6 | Toner Hp LaserJet 1015 (Q2612A) Refill | 1125/- Per Nos. | **1050/- Per Nos.** | 1225/- Per Nos. | 1150/- Per Nos. |
| 7 | Line Matrix Printer (Gen-Printronix Ribbon P5000) New | 950/- Per Nos. | **875/- Per Nos.** | 975/- Per Nos. | 1000/- Per Nos. |
| 8 | Line Matrix Printer (Gen-Printronix Ribbon P5000) Refill | 275/- Per Nos. | **250/- Per Nos.** | 295/- Per Nos. | 300/- Per Nos. |
| 9 | Tonner Hp LaserJet 2300n (Q2610A) New | 10,050/- Per Nos. | **9850/- Per Nos.** | 10975/- Per Nos. | 10075/- Per Nos. |
| 10 | Tonner Hp LaserJet 2300n (Q2610A) Refill | 1225/- Per Nos. | **1150/- Per Nos.** | 1300/- Per Nos. | 1275/- Per Nos. |
| 11 | Tonner Hp LaserJet 9000n New | 18500/- Per Nos. | 18250/- Per Nos. | 18750/- Per Nos. | **17925/- Per Nos.** |
| 12 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (56) New | 1525/- Per Nos. | **1485/- Per Nos.** | 1625/- Per Nos. | 1550/- Per Nos. |
| 13 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (57) New | 2550/- Per Nos. | **2475/- Per Nos.** | 2750/- Per Nos. | 2600/- Per Nos. |
| 14 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (58) New | 1825/- Per Nos. | **1785/- Per Nos.** | 1925/- Per Nos. | 1850/- Per Nos. |
| 15 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (27) New | 1425/- Per Nos. | **1350/- Per Nos.** | 1475/- Per Nos. | 1450/- Per Nos. |
| 16 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (20) New | 1825/- Per Nos. | **1750/- Per Nos.** | 1895/- Per Nos. | 1850/- Per Nos. |
| 17 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (49) New | 2250/- Per Nos. | **2150/- Per Nos.** | 2450/- Per Nos. | 2275/- Per Nos. |
| 19 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (28) New | 1825/- Per Nos. | **1725/- Per Nos.** | 1875/- Per Nos. | 1850/- Per Nos. |
| 20 | Hp DeskJet (5160) (656) (3320) (57, 57,58,27,20,49,28) (Ink) Refill | 275/- Per Nos. | **250/- Per Nos.** | 325/- Per Nos. | 300/- Per Nos. |
| 21 | Dust Cover | 250/- Per Nos. | **200/- Per Nos.** | 275/- Per Nos. | 260/- Per Nos. |
| 22 | PC Monitor Glass | 175/- Per Nos. | **140/- Per Nos.** | 200/- Per Nos. | 190/- Per Nos. |
| 23 | Epson/Wipro Lx 1170 (132) Ribbon New | 300/- Per Nos. | **275/- Per Nos.** | 350/- Per Nos. | 310/- Per Nos. |
| 24 | Epson/Wipro Lx 300 (80) Ribbon New | 250/- Per Nos. | **220/- Per Nos.** | 275/- Per Nos. | 260/- Per Nos. |
| 25 | Epson/Wipro Lx 1170 (132) Ribbon Refill | 100/- Per Nos. | **85/- Per Nos.** | 125/- Per Nos. | 110/- Per Nos. |
| 26 | Epson/Wipro Lx 300 (80) Ribbon Refill | 90/- Per Nos. | **75/- Per Nos.** | 110/- Per Nos. | 100/- Per Nos. |

| अ. क्र. | तपशिल | मे. के.जी.एम. सिस्टीम सोल्युशन | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स | मे. साई प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनरी | मे. वोरा इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|
| 27 | 132 Column Plastic File | 100/- Per Nos. | **75/- Per Nos.** | 120/- Per Nos. | 110/- Per Nos. |
| 28 | 80 Column Plastic File | 75/- Per Nos. | **45/- Per Nos.** | 100/- Per Nos. | 95/- Per Nos. |
| 28 | Samsung 2250 ML | 10,500/- Per Nos. | **10200/- Per Nos.** | 11500/- Per Nos. | 11000/- Per Nos. |
| 29 | Samsung 2250 ML (Refill) | 1225/- Per Nos. | **1150/- Per Nos.** | 1400/- Per Nos. | 1300/- Per Nos. |
| 30 | 11A (Yellow), (Magenta), (Cyan) | 2825/- Per Nos. | **2750/- Per Nos.** | 3000/- Per Nos. | 2900/- Per Nos. |
| 31 | 10A (Black) | 2825/- Per Nos. | **2750/- Per Nos.** | 3000/- Per Nos. | 2900/- Per Nos. |
| 32 | Pen Drive (512 MB) | 1590/- Per Nos. | **1550/- Per Nos.** | 1800/- Per Nos. | 1625/- Per Nos. |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता अनु. क्र. १ ते १० व १२ ते ३२ करिता मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. अनु. क्र. ११ करिता मे. वोरा इंटरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे.

## विषय क्र. २ :- संगणक प्लेन व प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणे.

महानगरपालिका संगणक विभागाकरीता आवश्यक असलेली प्लेन व प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणेकामी दि. १४/११/२००६ रोजी दैनिक सुरजप्रकाश व हमारा महानगर या वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. लकी प्रिंटर्स | मे. आरचिस इंटरप्रायजेस | मे. वोरा इंटरप्रायजेस | मे. साई प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनरी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Plain 80 Column Stationary I Part (60 GSM) | 600/- per thousand | 625/- per thousand | 515/- per thousand | 550/- per thousand |
| 2 | Plain 80 Column Stationary II Part (60 GSM) | 1400/- per thousand | 1400/- per thousand | 1360/- per thousand | 1390/- per thousand |
| 3 | Plain 132 Column Stationary I Part (60 GSM) | 950/- per thousand | 975/- per thousand | 870/- per thousand | 925/- `per thousand |
| 4 | Plain 132 Column Stationary II Part (60 GSM) | 2400/- per thousand | 2300/- per thousand | 2175/- per thousand | 2250/- per thousand |
| 5 | Plain 132 Column Stationary III Part (60 GSM) | 3320/- per thousand | 3400/- per thousand | 2900/- per thousand | 3100/- per thousand |
| 6 | Pre Printed 80 Column Stationary I Part (70 GSM) | 1500/- per thousand | 1400/- per thousand | 1390/- per thousand | 1270/- per thousand |
| 7 | Pre Printed 80 Column Stationary II Part (60 GSM) | 2000/- per thousand | 1900/- per thousand | 1890/- per thousand | 1790/- per thousand |
| 8 | Pre Printed 132 Column Stationary I Part (70 GSM) | 1600/- per thousand | 1625/- per thousand | 1525/- per thousand | 1500/- per thousand |
| 9 | Pre Printed 132 Column Stationary II Part (60 GSM) | 2500/- per thousand | 2450/- per thousand | 2425/- per thousand | 2390/- per thousand |
| 10 | Pre Printed (Both Side) As Per Programme Setting A4 (85 GSM) | 1900/- per thousand | 1950/- per thousand | 1800/- per thousand | 1720/- per thousand |
| 11 | Pre Printed (Single Side) As Per Programme Setting A4 (85 GSM) | 1400/- per thousand | 1380/- per thousand | 1350/- per thousand | 1270/- per thousand |
| 12 | Computer Use Branded Co. A4 Plain Papers (80 GSM) 500 Papers Each Packet | 196/- per packet | 195/- per packet | 189/- per packet | 187/- per packet |
| 13 | Computer Use Branded Co. A4 Ex Bond Papers (70 GSM) 500 Papers Each Packet | 410/- per Packet | 425/- per Packet | 390/- per Packet | 405/- Per packet |
| 14 | Computer Use Branded Co. A4 (Alabaster) (90 GSM) 500 Papers Each Packet | 481/- per packet | 500/- per packet | 480/- per packet | 482/- per packet |
| 15 | Laser Paper (90 GSM) 500 Papers Each Packet | 470/- per packet | 435/- per packet | 409/- per packet | 425/- per packet |

| अ. क्र. | तपशिल | मे. लकी प्रिंटर्स | मे. आरचिस इंटरप्रायजेस | मे. वोरा इंटरप्रायजेस | मे. साई प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनरी |
|---|---|---|---|---|---|
| 16 | Computer Use Branded Co. A3 Plain Papers (80 GSM) 500 Papers Each Packet | 400/- per packet | 390/- per packet | 375/- per packet | 380/- per packet |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता अनु. क्र. १ ते ५ व १३ ते १६ करिता मे. वोरा इंटरप्रायजेस यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. अनु. क्र. ६ ते १२ करिता मे. साई प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनरी यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५७ चे वाचन केले.)

**तुळशीदास म्हात्रे :-**

या विषयावर मी पत्र दिलेले आहे त्याचे मला अजून उत्तर दिलेले नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्याचा प्रश्न काय होता?

**दिपक खांबित :-**

तीन दिवसाचा जो कार्यक्रम ठेवला होता त्यामध्ये सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब ह्याची ऑब्जेक्शन घेतले आहे.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १५७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

सदर ठरावास माझे अनूमोदन आहे.

**प्रकरण क्र. १५७ :-**

महापौर चषक २००६ वाढीव खर्चास मंजुरी देणे.

**ठराव क्र. १६० :-**

मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत आयोजित महापौर चषक २००६ मध्ये या वर्षी मोठया प्रमाणावर स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आल्याने मंजूर खर्चात मोठया प्रमाणावर वाढ झालेली आहे. मा. स्थायी समिती सभा दि. १७/०४/२००६ ठराव क्र. ०४ अन्वये रु. २०.०० लक्ष रकमेस मंजूरी देण्यात आली होती. पंरतू प्रत्यक्षात रू. ३३.०० लक्ष खर्च झालेला आहे. तरी वाढीव रू. १३.०० लक्ष सहीत एकूण रू. ३३.०० लक्ष रकमेच्या खर्चास हि सभा मंजूरी देत आहे. तसेच पुर्नविनियोजनाद्वारे रस्ते नविन यालेखाशिर्षातून रू. १३.०० लक्ष तरतूद उपलब्ध करून मंजुर दराने ठेकेदाराचे देयक त्वरीत प्रदानास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर, तसेच, सर्व सन्मा. सदस्यांना माझ्याकडून नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा. हा नाताळ सण सर्वांना सूख, शांती, समृद्धी आणि भरभराटीच्या जाओ व आजची ही सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पाडली याबद्दल आपणा सर्वांचे धन्यवाद.

**एस. ए. खान :-**

आमच्याकडून ही आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

**ग्रिटा फॅरो :-**

नाताळ सणाच्या सर्व सदस्यांना व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा.

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्या, सन्मा. सदस्य, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची ही सभा संपल्याचे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०२.१५ वा.**

**सही/-**<br>**सभापती**<br>**स्थायी समिती**<br>**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**<br>**मिरा भाईंदर महानगरपालिका**